9 May 2012

॥श्री॥

ॐ श्री परमात्मने नम:।

## विभूतियोग - अध्याय - १० वा

श्रीमद्भगवद्गीतेच्या मध्यावर भगवंतांनी हा विभूतियोग सांगितला आहे. नवव्या अध्यायात त्यांनी राजविद्या राजगुह्ययोग सांगितला आहे. त्यामध्ये त्यांनी अतिशय गुह्य (गूढ) आणि सर्व विद्यांमधील श्रेष्ठ विद्या 'अध्यात्मविद्या' याविषयी विवेचन केले आहे. तसेच त्यात भगवंत म्हणतात - मया ततमिदं सर्वं जगदव्यक्तमूर्तिना। म्हणजेच मी निराकार परमात्म्याने हे सर्व जग पूर्ण व्यापले आहे. या विधानाचा विस्तार म्हणजे हा विभूतियोग असे म्हणता येईल. किंवा नववा अध्याय ऐकून झाल्यावर अर्जुनाचा चतुर प्रश्न असा आहे की हे सर्व मला समजले परंतु तुम्हाला मी कोठे पाहू? या सर्व दृश्य सृष्टीमागील चैतन्यतत्त्व आपणच आहात हे मला पटले. तरीपण आपला शोध घ्यायचा झाला तर तो कसा आणि कोणत्या गोष्टींमधून घ्यावा. म्हणजेच ठळकपणे आणि निश्चितपणे आपण कोठे असाल ते कृपया सांगावे.

कोठे केतासी चिंतू जरी म्हणसी असे
ऐक माझ्या विभूती।
संक्षेपे अर्जुना हे गुज गुज कथितो
मी असे सर्व भूती।
मी धाता विष्णु मी श्री शिव रवि निगमी
साम मी विश्वरूप
माझी सर्वत्र सत्ता जगी असुनी असे
दिव्य माझे स्वरूप ॥

Notes

SUNDAY 2

| S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | JAN |

www.madhaveeraghuveer.com

अर्जुनाच्या प्रश्नाला उत्तर देताना भगवंत आपला नेमका पत्ता सांगत आहेत. यापूर्वी देखील भगवंतांनी ७ व्या अध्यायात (१७) आणि ९ व्या अध्यायात (३७) विभूति सांगितल्या आहेत. परंतु त्यांना आणखीही काही विभूति सांगायच्या आहेत. म्हणून पहिल्याच श्लोकात 'भूय एव' म्हणजे 'पुन्हा एकदा' असे म्हणतात.

याच्यापुढे १३ व्या आणि १५ व्या अध्यायातही काही विभूति सांगितल्या आहेत. मग तरीही हा स्वतंत्र अध्याय का सांगितला आहे? कारण—

१. अर्जुनाला पूर्ण ज्ञानी करायचे होते.
२. अध्यात्मसाधनेत स्थूल व सूक्ष्म दोन्ही रूपे जाणणे गरजेचे आहे.
३. स्थूल/सगुण साधनेत - सगुण रूपे माहिती हवीत.
४. निर्गुण साधनेत सूक्ष्म, निर्गुण रूपाचेही अंतरंग व बहिरंग माहीत हवे.

पूज्य विनोबा भावे म्हणतात - लहान मुलाला शिकवताना एकेक अक्षर पाटीवर मोठे काढतात. नंतर मूल लहान अक्षर काढायला शिकते. नंतर मिसळीचे जोडाक्षर शिकते. त्यानंतर नुसत्या उच्चारानेही त्याला वाच्यार्थ/लक्ष्यार्थ समजू लागतो. तसेच स्थूलाकडून सूक्ष्माकडे जाण्याचा मार्ग हा अध्याय शिकवतो.

www.majhaveeraghuveer.com

Notes

| 2011 | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| JAN | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

पती-पत्नीमधील प्रेम प्रथम कदाचित बहिरंगावर, रूपावर असेल. परंतु अनेक वर्षांच्या सहवासाने ते त्या व्यक्तीच्या अंतरंगावर जडते. केस पांढरे झाले, दात पडले किंवा बिछान्यावर खिळून असलेल्या जोडीदारावरचे प्रेम किंचितही कमी होत नाही. स्थूलाकडून सूक्ष्माकडे जाण्याचा प्रवास हा असा आहे.

आपल्या सर्व देवतांचेही असेच आहे. विठोबा म्हटल्यावर 'कटेवरी हात विटेवरी उभा' असे साजिरे रूप डोळ्यासमोर येते. दत्त म्हटल्यावर 'तीन मुखे कर सहा शोभती' असे रूप दिसते. तिरुपती बालाजी म्हटल्यावर अनेक सुवर्ण, रत्ने इ० अलंकारांनी शोभून दिसणारी, डोळे बंद, भाळावर गंध अशी मूर्ती डोळ्यांसमोर येते किंवा गणपतीचे नाव उच्चारताच सरळ सोंड, सुपासारखे कान, मोठे उदर असे रूप नजरेसमोर तरळून जाते. मात्र या पार्थिव प्रतीमेच्या पलीकडेही त्या देवतेचे रूप साकारता येते. विशिष्ट पद्धतीने लावलेले नुसते गंध पाहून तिरुपती बालाजीचा बोध होतो. नुसता सोंडेचा वक्राकार, मोठे पोट, लहानसा उंदीर किंवा नुसते जास्वंदीचे फूल असे चार पाच वळणदार रेषांमधून गणपती साकारता येतो. नुसती बासरी आणि मोरपीस आपल्याला श्रीकृष्णाची आठवण करून देते. एखादा दही, लोण्याने भरलेला घडा पाहून आपण बाळकृष्णाची आठवण करतो.

Notes

*Guru Govind Singh Jayanti (IN)*

यानंतर पुढची पायरी म्हणजे डोळ्यांसमोर काहीही नसले तरी दुरून ऐकू येणारी गणपतीची आरती, सुप्रभातमधले सूर किंवा मुरलीरव आपल्याला त्या त्या देवता डोळ्यांसमोर उभ्या करतात. स्थूलातून सूक्ष्मात जाणे आणि सूक्ष्मातून पुन्हा स्थूल स्वरूपाकडे येणे अशी ही सगुण आणि निर्गुण भक्ती एकमेकात गुंफलेली आहे.

(डॉ. वि. य. कुलकर्णी) भगवंत सर्व चराचरात व्यापून राहिलेले आहेत. परंतु सामान्य जनांना ते पाहणे शक्य होत नाही. जे मोठाल्या पर्वतात आहे तेच एका लहानशा धुळीच्या कणातही आहे. मात्र पर्वतातील विभूतितत्त्व पटते आणि धुळीच्या कणातील भगवंत मान्य होतो पण तरीही मानवत नाही. त्यासाठी भगवंत प्रथम ठळक ठळक विभूति सांगतात. एकदा ते समजले की लहान गोष्टीतील सुद्धा विभूतिभाव उमगायला लागेल. 'राम' हे सरळ अक्षर आहे. तिथे शुद्ध परमेश्वरी आविर्भाव सहज प्रगट झाला आहे. तिथे दया आहे, वत्सलता आहे, प्रेम आहे असा जो हा राम तो सरळ परमेश्वर आहे. मात्र रावणाच्या ठिकाणी मिसळ आहे. रावणाची तपस्या, कर्मशक्ती थोर आहे. परंतु त्यात क्रूरपणा मिसळलेला आहे. रामाला परमेश्वर चटकन आकलन होईल. रावणाच्या ठिकाणी परमेश्वर पहायला थोडा वेळ लागेल. पण जे रामात आहे ते रावणातही आहे. जे सोन्यात आहे ते कोळशात, जे सिंधूत ते बिंदूत, जे स्थूलात ते सूक्ष्मात आहे.

Notes

| 2011 | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| JAN | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

अशा पद्धतीने आपल्याला जगाचा ग्रंथ वाचायला शिकायचे आहे. या सृष्टीच्या पुस्तकात सुंदर अक्षरांनी परमेश्वर लिहिला आहे. परंतु तो आपणास दिसत नाही. ईश्वराचे दर्शन होण्यात एक मोठे विघ्न आहे ते हे की जवळचे ईश्वरस्वरूप माणसाला पटत नाही व दूरचे प्रखर रूप पचत नाही. साधे दूध रुचत नाही आणि पेढे बर्फी पचत नाही.

त्यासाठी सृष्टीतही जी विशाल आणि मनोहर रूपे आहेत तिथे ईश्वराला बघायला शिकायचे तसेच मानवातील सौम्यतम आणि पावन मूर्तीत ईश्वराला आधी पहायला शिकायचे. गरुडात भगवंत आहे तसाच तो चिमणीतही आहे. कोकिळेत आहे तसा कावळ्यातही आहेच. दुर्जनाच्या ठिकाणचा परमेश्वर पहायला शिकले पाहिजे. प्रल्हाद पटतो तसा हिरण्यकश्यपूही पटला पाहिजे.

स्थूल व सूक्ष्म, सरळ व मिश्र, सोपी अक्षरे व जोडाक्षरे असे सगळे शिका म्हणजे शेवटी परमेश्वराशिवाय काही स्थळ नाही हे अनुभवाला येईल. अणुरेणूतही तोच आहे. मुंगीपासून ब्रह्मांडा-पर्यंत सर्वत्र परमात्मा भरून राहिला आहे. सर्वांची सारखीच काळजी वाहणारा कृपाळू, ज्ञानमूर्ती, वत्सल समर्थ, पावन, सुंदर असा परमात्मा सर्वत्र उभा आहे. अहर्निश अभ्यास करून सर्व विश्व आत्मरूप पहावयास शिकायचे हे हा अध्याय शिकवतो.

*Notes*

| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | | | | 2011 |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | | | | FEB |

www.madhaveeraghuveer.com

या अध्यायात वस्तुजाताकडे चिन्मय दृष्टीने पहावे असे सांगितले आहे. लहान मोठ्या साऱ्याच वस्तू चिदंश असतात. हा आहे चैतन्यवाद. या विरुद्ध 'जडवाद' आहे. सारी सृष्टी जड आहे.

यासाठी गीता सांगते 'ज्ञानं विज्ञानसहितम्।' उपनिषदांची हीच शिकवण आहे.

'जे विद्येची (ज्ञान) आणि अविद्येची (विज्ञान) दोन्ही मिळून उपासना करतात ते अविद्येने मृत्यु तरुन जातात व विद्येने अमृत प्राप्त करुन घेतात.'

जडावाचून चैतन्याला अभिव्यक्ती नाही तर चैतन्यावाचून जडाचा विकास संभवत नाही. म्हणून जडवाद विरुद्ध चैतन्यवाद असे तत्वज्ञानाचे स्वरूप योग्य नाही तर दोन्ही मिळून 'पूर्णवाद' तयार होतो. चिन्मयत्व विविधतेने नटले आहे अशी आपणास दृष्टी येईल तर जीवन अमृतानुभव आहे आनंद नृत्य आहे असा स्वस्थ आणि उत्साहवर्धक दृष्टीकोन येईल.

विभूति-विस्तार हा जडवाद व चैतन्यवाद यांना जोडणारी कडी आहे.

प्राणी सृष्टीतील वा पक्षी सृष्टीतील भव्यता सामर्थ्यरूपाने प्रगट होते. हत्ती, मगर, गरुड, नाग यातील विभूतिमत्व म्हणजे बलशालीत्व आहे.

मानवी जीवनातील विभूतिमत्वाची कल्पना न्यारीच आहे. मन-बुद्धी ज्यावेळी शरीराच्या मारतात

*Notes*

| 2011 | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| JAN | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

रुतून बसतात त्यावेळी ती शुद्ध होतात. पण यात मन-बुद्धीच्या आधाराने व्यापकता, विशालता प्रगट होऊ शकते. महान तत्त्वचिंतक, वीर, लोकनेते, गुरु ज्ञानी, प्रेषित, संत, महाकवी, कलावंत, वैज्ञानिक आत्मसंयमी तपस्वी तसेच वस्तू घटना आणि शक्तींना आपल्या काबूत ठेवू शकणाऱ्या मानवात भगवान स्वतः प्रकट असतो.

मानवी मन ज्यावेळी आकाशात झेपावते त्यावेळी त्यातून चैतन्याचा प्रकाश फाकतो. ते जीवन परमात्मा व मानव यांना जोडणारी कडी ठरते. त्यावेळी त्याला विभूति म्हणतात. असे लोक स्वतःच्या परिघातून बाहेर पडलेले असतात आणि व्यापक भूमिकेवर गेलेले असतात.

जड सृष्टीपासून मानवापर्यंतचे क्रमविकसन सृष्टीक्रमातच झालेले आहे. हळूहळू जडता मागे पडते सूक्ष्मता विकसित होत जाते. चिदंश अधिक प्रगट होत जातो. ज्यांच्यात ईश्वरी तेज प्रकट होते त्यांना योगी म्हणायचे, भक्त म्हणायचे, विभूति म्हणायचे. हे विभूतिमत्त्व 'ज्योतिर्मय' असते म्हणून ज्योतीच्या आकाराचे दाखवले जाते. ही सर्व मानवी आकांक्षांची आंतरिक ऊर्ध्वगामी (वर वर चढत जाणारी) व जडता कमी कमी होत गेलेली प्रक्रिया मंदिर या प्रतीकातून आपणासमोर ठेवण्यात आलेली आहे. मंदिर हळूहळू वर चढत जाते निमुळते होत जाते. जणू जडता सोडत जाते. शेवटी

Notes ज्योतिर्मय कळस असतो. हीच ती आत्मज्योति आहे. SUNDAY 9
मंदिरात आल्यानंतर कळसाचे दर्शन घ्यायचे आहे.

| T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | FEB |

8.00 (पांडुरंगशास्त्री आठवले) या अध्यायात अर्जुनाने कोणताही
प्रश्न विचारलेला नाही. भगवंत आपण होऊनच सांगत
9.00 आहेत. अर्जुन अत्यंत प्रिय आहे त्यामुळे अर्जुनाला गरज
आहे किंवा नाही याचा विचार न करता त्याच्या
10.00 हितासाठी भगवंत सांगत आहेत. कारण हितकारक
आणि सुखकारक या दोन्ही वेगवेगळ्या गोष्टी आहेत.
11.00 अप्रियस्य च पथ्यस्य वक्ता श्रोता च दुर्लभः।

(२) आईच्या उदरातून नुकतेच जन्मलेले मूल
12.00 आईचे वय जाणू शकत नाही. खायला प्यायला देणारी
सोपवणारी ती आई एवढेच ते मूल जाणते. तिचे
1.00 रूप, बुद्धिमत्ता, कर्तबगारी, गुण वगैरे त्याला कळत नाही.

(३) अर्जुनाला सर्वांत जास्त भीती पापाची वाटते.
2.00 मृत्यूची देखील वाटत नाही. ती पापाची भीती दूर
होण्यासाठी ईश्वरस्वरूपाच्या ज्ञानाची गरज आहे.
3.00 परमेश्वर अज, अनादि, लोकनियंता आहे असा
निश्चय झाल्याशिवाय परमेश्वराचे पूर्ण ज्ञान होत नाही.

4.00 (७) विभूति समजण्याची अट - अविकंपी साधना.
साधना किंवा निश्चय अटळ हवा, अविचल हवा. एकदा
5.00 विश्वाचा कर्ता तो आहे असा दृढ विश्वास आला की
माझाही कर्ता निश्चितपणे तोच आहे हे समजते व
6.00 अहंकार लोप पावतो. दृढ भक्ती उदयाला येते.

(८) माझे शरीर मी चालवत नाही तोच चालवतो हे
7.00 बोलणे वेगळे व समजणे वेगळे. ज्ञान (Knowledge)
व बोध (Understanding) ह्यात फरक आहे. इथे

Notes ज्ञानी हा शब्द न वापरता बुधाः म्हटले आहे.
केवळ शब्द घोकून समजूत येत नाही. बोध ही वेगळीच
गोष्ट आहे. तो अनुभूतिजन्य आहे. जो निर्भय, निःस्पृह
व निरहंकारी असतो त्याला बुध म्हटले आहे. आणि
गीताकारांनी नुसता बुध न म्हणता बुधा भावसमन्विताः

| 2011 | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| JAN | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

www.madhaveeraghuveer.com

म्हटले आहे. विश्वाचे परिपूर्ण ज्ञान झाल्यावरही ज्याचे हृदय भावपूर्ण आहे तो बुधही आहे भावसमन्वित: ही आहे. अशा प्रभुमय झालेल्यांचे वर्णन गीताकार करतात.

(e) मच्चित्ता:- ज्यांच्या चित्तात सतत भगवंत चिंतन सुरु असते. सर्व व्यवहार इतरांप्रमाणे करत असतानाही त्यांना भगवंताच्या सान्निध्याचे सतत भान असते. असे लोक वासनेच्या हातातून सुटून वासुदेवाच्या हातात गेलेले असतात ते प्रथम अहंकार व नंतर मन बुद्धीचे समर्पण करतात. तुकाराम महाराज म्हणतात –

आपुलिया बळे नाही बोलवत
सखा कृपावंत वाचा त्याची।

अशा तऱ्हेने अहंकार अर्पण केल्यावर मानवी जीवनात स्वाधीनता येते स्वतंत्रता येते. व मानव वासनांच्या गुलाम होत नसला तरी सतत कर्म करत रहातो. श्रीमद् शंकराचार्य किंवा वल्लभाचार्य किंवा कोणतेही थोर संत ह्यांच्यासारख्या लोकांना जीवनात काहीही नको होते तरीही ते गप्प राहिले नाहीत तर सतत प्रवृत्ती करीत राहिलेले दिसतात. एकदा अहंकाराचे समर्पण केले की जीवनात पावित्र्य व तृप्ती येते. आणि ज्यांच्या जीवनात तृप्ती आली त्यांचे विचार ढिले होत नाहीत, वाणी दुबळी होत नाही आणि त्यांचे जीवन निष्प्राण होत नाही. तर जिवंत, रसरशीत असते असेच लोक तुष्यन्ति च रमन्ति च असतात. अशा प्रकारे जीवनात पावित्र्य व तेजस्विता आल्यावर तिसरी गोष्ट विश्वात्मैक्याची व चौथी गोष्ट प्रभुप्रेमाची प्राप्ती या येतात.

मद्गतप्राण – म्हणजे भगवंताला प्राण देणारा प्राण म्हणजे भूक तहान नाही. स्त्री, सत्ता, कीर्ति, पैसा अशा वेगवेगळ्या भुका ज्यांच्या शांत झाल्या आहेत

Notes

| T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | FEB |

www.madhaveeraghuveer.com

ते मद्गतप्राण होतात त्यांना जीवन दुःखमय वाटत नाही.

(१०) ज्ञानपूर्वक अनासक्ती + भक्तीपूर्ण आसक्ती = बुद्धियोग

तिजोरी उघडताना माणूस अधिकारी आहे की नाही हे बघून तिजोरी उघडतात. हा अध्याय म्हणजे भगवंतांचे जडजवाहिर आहे.

जी बुद्धी भगवंताशी जोडते व आपला संबंध प्रस्थापित करते तो बुद्धियोग!

(११) भगवंत त्यांच्या बुद्धित ज्ञानदीप प्रज्वलित करतात.

१२ व्या श्लोकापासून अर्जुनाने भावपूर्ण अंतःकरणाने एक स्तोत्र गायले आहे.

ज्याला आकार आहे त्याला विकार येणारच. पण आपण निराकार आहात, व्यापक आहात. हे सत्य आहे. पण व्यापक भगवंताचे चिंतन करायचे तर व्यक्ततेचा अनुभव घ्यायला हवा. तेव्हा कोणत्या भावात तुझे चिंतन करु? चित्त एकाग्र कसे करु? माझ्या जीवनात गुण यायला मी काय करु? हे सर्व तुम्ही सविस्ताराने सांगा. आत्मनः योगम् म्हणजे तुमच्या कोणाशी आत्मयोग झाला आहे ते मला सविस्तर सांगा. हे ऐकून भगवंत प्रसन्न झाले व पहिलाच शब्द उच्चारला तो म्हणजे हन्त!

हन्त शब्दाचे अनेक अर्थ आहेत. अनुकंपा किंवा आनंद व्यक्त करण्यासाठी हा शब्द वापरतात.

Notes

भगवंतांनी अर्जुनाला जे सांगितले ते अर्जुन योग्यप्रकारे समजला त्याचा भगवंतांना आनंद झाला आहे आणि भगवंत आता विश्वव्यापी तत्वज्ञान सांगणार आहेत. इथे भगवंतांनी 'हन्त' शब्द आनंद या अर्थी वापरला आहे.

| 2011 | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| JAN | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

www.madhaveeraghuveer.com

त्याचे दुसरेही एक कारण आहे आणि ते म्हणजे समाजाचे उन्नतीकरण. मानव समाजाची उन्नती हा एक वैश्विक प्रश्न आहे. भोग हवासा वाटणे हे नैसर्गिक असले तरी हा भोगयोग ईशयोगापर्यंत -विभूतियोगापर्यंत घेऊन जाणे म्हणजे मानवाचे उत्थान करणे, उन्नतीकरण होणे. ही सृष्टी भोगासाठी नसून पूजेसाठी आहे. सृष्टीशी तादात्म्य स्थापित करणे ही संस्कृती आहे. त्यातून सृष्टीविषयी आत्मीयता व पूज्य भाव वाढीस लागतो. प्राचीन काळच्या ऋषीमुनींनी हे सृष्टीचे पुस्तक वाचले व जीवन विकसित केले. निसर्ग हा महान गुरु आहे.

सृष्टीत मांगल्यदर्शन झाले तर ईशदर्शनही घडेल. विभूतियोग म्हणजे सृष्टीच्या वैभवाचे वर्णन. ते वैभव त्यांनी अर्जुनासमोर खुले केले.

घरी थोडेसे उदक घालिजे । तेणे न गळे तरी वरीना मारिजे ।
ऐसा पारसौनि पाहिलारे तव पारसाविजे ।
ऐसाचि होतसे ॥ ज्ञानेश्वरी १०.५१

सद्गुरु प्रथम साधकाला थोडेसे ज्ञान देतात. तो ते कसे ग्रहण करतो आहे हे पाहूनच मग पूर्ण ज्ञान देतात.

Notes

www.madhuraveeraghuveer.com

(१) सातव्या आणि नवव्या अध्यायात काही विभूति सांगून झाल्या आहेत म्हणून १ल्या श्लोकात भगवंत भूय एव म्हणजे पुन्हा एकदा सांगत आहेत. परमं वचः- म्हणजे अंतःकरणातील गोष्ट आपल्या प्रिय अर्जुनाला (प्रीयमाणाय) सांगत आहेत. श्रोत्याच्या मनात वक्त्या-विषयी प्रीति आणि श्रद्धा असावी तरच तो विषय त्याच्या अंतःकरणात सरळ आणि अटळरुपाने स्थिर होतो. इथे अर्जुनाला उद्देशून 'महाबाहो' हे संबोधन वापरले आहे. ते अर्जुनाच्या श्रेष्ठतेचे, उपदेश धारण करण्याच्या सामर्थ्याचे, अधिकारतेचे सूचक आहे. हितकाम्यया - जीवाचे हित करण्याच्या उद्देशाने हा उपदेश केला आहे. भगवान सामान्य रुपाने सर्व प्राण्यांचे सुहृद आहेत. परंतु जेव्हा कोणी व्याकुळ होऊन त्यांना शरण येतो तेव्हा भगवंताच्या मनात त्याच्या हिताच्या विशेष भाव प्रगट होतो. जसे वासरु समोर येताच गायीच्या शरीरात असलेले दूध तिच्या स्तनात येते. या पहिल्या श्लोकापासून भगवंत विभूतियोगाची प्रस्तावना करत आहेत. आता भगवंतच हे विवेचन स्वतः का करत आहेत? इतर ऋषीमुनींच्या मुखातून परमवाक्य श्रवण करुनही हे ईशतत्त्वाचे यथार्थ ज्ञान झाले असते. त्याचे स्पष्टीकरण पुढील श्लोकात देत आहेत.

(२) परमात्म्याचे रुप अगम्य आहे. इंद्रादी देवता किंवा भृगु इ० महर्षिगणांनाही ईश्वराच्या प्रभावाचे ज्ञान नाही.

Notes

www.madhaveeraghuveer.com

| 2011 | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| JAN | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

बेत्ती - दृढतापूर्वक, संदेहरहित स्वीकार करणे. भगवान जाणण्याचा विषय नाही तर मानण्याचा, अनुभवण्याचा विषय आहे.

कारण या सर्वांचा आदि परमात्माच आहे. ज्याप्रमाणे पोटात असणारा गर्भ आईचे वय जाणत नाही त्याप्रमाणे भगवंतांना देव महर्षि जाणू शकत नाहीत.

असीमाला सीमित बुद्धीने जाणता येत नाही.

(३) परंतु जो मला अजन्मा व अनादि तसेच लोकांचा महान ईश्वर असे तत्वत: जाणतो तो ज्ञानवान मनुष्य सर्व पापांपासून मुक्त होतो.

१. लोक - विश्व
२. लोक - शरीर

अर्जुनाला मृत्युची भीती कधीच नव्हती. मात्र पापाची मात्र त्याला भीती वाटत असे.

ईश्वराच्या सत्स्वरूपाचे यथार्थ ज्ञान झाले की अज्ञानरूप संमोह नाहीसा होतो आणि सर्व दुःखांची आत्यंतिक निवृत्ति होते. [७.२४ मध्ये व्यतिरेक पद्धतीने तर इथे अन्वय पद्धतीने]

ईश्वर लोकमहेश्वर आहे याचे स्पष्टीकरण -

(४)(५) भगवंतांचे हे विभूतिवैभव आहे. विभूति म्हणजे तेज, शक्ती, ऐश्वर्य, प्रभुता.

जेव्हा भगवंत एखादा वस्तूत आहे असे सांगतात तेव्हा त्यातील उत्तम भावच ध्यानात घ्यावा.

बुद्धी - प्रत्येकाचा आपल्या ध्येयावरून वाटचाल करताना ज्यामुळे निश्चय होतो आणि त्या मार्गावरून वाटचाल करायला ज्यामुळे सामर्थ्य लाभते त्याला बुद्धी म्हणायचे.

ज्ञान - कर्तव्य काय, अकर्तव्य काय? सार काय असार काय? सत - असत काय? हा नीर - क्षीर विवेक ज्याच्यामुळे घडतो ते ज्ञान होय. व्यावहारिक अर्थाने ज्ञान म्हणजे माहिती, ओळख, जाणिव. परंतु आत्मिक ज्ञानाखेरीज पूर्णता नाही. मोराच्या अंगावर अंगभर दृष्टिहीन डोळे असतात परंतु त्याचा काहीही उपयोग नाही.

Notes

SUNDAY 16

| T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | FEB |

www.madhaveeraghuveer.com

8.00 आत्मज्ञान हा बोलण्याचा नसून साक्षात्काराचा विषय आहे.
असम्मोह - बाह्यांगावर भुलून, भुरळ पडून मनुष्य
9.00 मार्ग आक्रमतो त्याला संमोह म्हणावे. पण हा
संमोह खोटा आहे हे ज्याच्यामुळे कळते ते ईशतत्त्व
10.00 आहे आणि भगवंत म्हणूनच म्हणतात मी असंमोह आहे.
क्षमा - शिक्षा करण्याची पात्रता आहे, शिक्षा करण्याचे
11.00 सामर्थ्य आहे, बळ आहे. असे असूनसुद्धा क्षमा करण्याचे
औदार्य दाखवणे ही खरी क्षमा आहे. अशी ही क्षमा
12.00 शांतिपूर्ण हवी. अंत:करणात धुसफूस नको. इहलोकात
किंवा परलोकात सुद्धा त्या व्यक्तीचे अकल्याण चिंतू
1.00 नये. क्षमा शस्त्र करे यस्य धायया किं न सिध्यते।
अतृणे पतितो वह्नि: स्वयमेवोपशाम्यति।
2.00 सत्य - जे अनृत नाही ते सत्य। ते भूताधिष्ठित
असावे - Universal Truth. निसर्गनियमांना बाधक
3.00 न ठरता ज्यायोगे सर्व प्राणिमात्रांचे कल्याण होते
असा शब्द, असा विचार, अशी कृती, म्हणजे सत्य!
4.00 दम आणि शम - बाहेर जाणाऱ्या इंद्रियांना अंतर्मुख
करायचे आणि त्यांना त्यांच्या गोलकामध्ये स्थिर
5.00 करायचे म्हणजे दम! आणि इंद्रियांना उन्मत्त होऊ न
देता आपला जो अंतरात्मा त्याच्यावर, त्या चैतन्यावर
6.00 त्याला लक्ष केंद्रित करायला लावायचे याला म्हणायचे शम!
सुख-दुःख - हे सापेक्ष असते. एखाद्याला ज्यात सुख
7.00 वाटेल ते दुसऱ्याला दु:खकारक वाटू शकते. किंवा
एखाद्या व्यक्तीला वेगवेगळ्या काळात वेगवेगळ्या

Notes

| 2011 | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| JAN | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

www.madhuraveeraghuveer.com

गोष्टी सुखकारक किंवा दुःखकारक वाटू शकतात. थंड वाऱ्याची झुळूक उन्हाळ्यात आल्हाददायक तर हिवाळ्यात नकोशी वाटते. थोडक्यात सुख म्हणजे अनुकूलता तर दुःख म्हणजे प्रतिकूलता!

**भव आणि अभाव** - भव म्हणजे असणे आणि अभाव म्हणजे नसणे. उत्पत्ति व प्रलय हे ईश्वरच आहे.

**भय अभय** - वाईट गोष्टींबद्दल भय आणि उत्तम कर्म करण्यासाठी लागणारे अभय दोन्ही भगवंतच आहेत. दैवी संपत्तीमधील आघाडीचा सद्गुण अभयच आहे.

**अहिंसा** याला व्यापक अर्थ आहे. शारीरिक, वाचिक आणि मानसिक अहिंसा अशा त्याच्या चढत्या श्रेणी आहेत. भगवान महावीर हे अहिंसेचे प्रणेते होते. म० गांधीजींच्या पंचशील तत्त्वामध्येही अहिंसा प्राधान्याने येते.

**समता** - समत्वं योग उच्यते। समत्व म्हणजे निर्द्वंद्वावस्था। जीवनातील सर्व द्वंद्वे सोसण्याची अपूर्व तितिक्षा. आधुनिक साम्यवादी विचारसरणी (communism) संपूर्ण समतेचा आग्रह धरते पण या आधुनिक साम्यवाद्यांनीच रक्तरंजित क्रांति घडवून आणली. निर्घृणपणे शिरकाण केले. अशी समता गीतेला अपेक्षित नाही. गीतेतील तत्त्वज्ञान खोट्या समतेच्या तत्त्वावर उभारलेले नाही. उलट निसर्गाची विविधता, विषमता स्वीकारून त्यात एकात्मता कशी पहावी हे गीता शिकवते.

**तुष्टी** - संतोष, समाधान. जे भगवंतांनी दिले आहे आणि

*Notes*

www.madhaveeraghuveer.com

जे क्रियमाण कर्मातून लाभलेले आहे आणि आपल्या संचितातल्या प्रारब्धाने मिळालेले आहे यात समाधान मानणे याला तुष्टी म्हणतात. मनात जर संतोष नसला तर असूया निर्माण होते. आशीर्वचन देताना ब्रह्मवृंद म्हणतात - शान्तिरस्तु, तुष्टिरस्तु, पुष्टिरस्तु!

**तप** - अनुकूल किंवा प्रतिकूल काल शांतपणे सहन करणे म्हणजे तप. म्हणजे द्वंद्वाची कोणतीही अवस्था सहिष्णुतेने आनंदाने सहन करणे - तप! जे उद्दिष्ट गाठायचे तिथपर्यंत जाण्यात कितीही अडचणी आल्या तरी न डगमगता ध्येयापर्यंत जाणे.

रत्नैर्महार्हैस्तुतुषुर्न देवा
न भेजिरे भीमविषेण भीतिम्।
सुधां विना न प्रययुर्विरामम्
न निश्चितार्थाद्विरमन्ति धीराः॥ नीतिशतक

त्याचप्रमाणे शारीरिक, वाचिक व मानसिक तप असते.

**दान** - भगवंत हे स्वतः दानस्वरूप आहेत. गीतेत सात्त्विक राजस तामस अशी तीन प्रकारची दाने सांगितली आहेत. दान देणे हे कर्तव्यच आहे या उदात्त भावनेने योग्य देश काल पात्र पाहून दिले जाते, जे देण्यामध्ये परतफेडीची अपेक्षा नसते ते श्रेष्ठदान, अन्नदान, जलदान, नेत्रदान, रक्तदान.

कर्णस्त्वचं शिबिर्मांसं जीवं जीमूतवाहनः।
ददौ दधीचिरस्थीनि नास्त्यदेयं महात्मनाम्।

थोर महापुरुषांना सर्व काही शक्य असते. ज्याचे दान देता येणार नाही अशी गोष्टच त्यांच्यासाठी नाही.

Notes

| 2011 | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| JAN | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

www.madhaveeraghuveer.com

<u>यशोऽयश</u> :- निष्कलंक यश आणि अपयश हे माझ्यापासूनच निर्माण होतात असे भगवंत म्हणतात. चंद्रावर तरी डाग आहे परंतु भगवंताचे यश धवल, अलांछन आहे.

अशा प्रकारे वर वर्णन केलेले प्राणिमात्रांचे वेगवेगळे भाव माझ्यापासूनच निर्माण होतात असे भगवंत म्हणतात. [डॉ. वि. ज. कुलकर्णी ↓

[विकासित झालेली ही २० मानसद्रव्ये आहेत.

पंचभूतात्मक सृष्टीला वैदिक परिभाषेत सत्य म्हटले आहे. हे सत्य भव आणि अभाव यांनी युक्त असते. सारी निर्मिती तपातून होते (अग्नितत्त्वाचून निर्मिती अशक्य) या तपासाठी पुरुष व प्रकृति एकमेकांना आपले स्वतःचे दान देतात व तृप्ती मिळवतात. याखेरीज सर्व प्राणी सृष्टी स्पंदनात्मक असते. ती सुख-दुःख, भय-अभय, यश-अपयश या भावातून व्यक्त होते. स्पंदन हे प्रसारण आकुंचन मिळूनच होते. यालाच प्राण अपान म्हणतात. म्हणून सारी विरुद्ध भावात्मक द्वंद्वे म्हणजे स्पंदनच होय. प्राणी आपला संरक्षणात्मक भाव भय वृत्तीतून दाखवतात. तर आपल्या संरक्षणास अनुकूल असा मित्र वा सहचर मिळाल्यास अभय दाखवतात. जीवन-कलहात यश मिळवतात तरीही जीवन व्यापार सृष्टिचक्रात संपून अपयशही प्राप्त होतेच. तेव्हा अशी ही द्वंद्वे प्राणिसृष्टीत दिसतात.]

Notes

| T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | FEB |

साधक संजीवनी

भगवंत एकच आहेत परंतु भाव वेगवेगळे, कधीकधी परस्परविरोधी ही आहेत.

एकाच हाताची ५ वेगवेगळ्या आकाराची बोटे असावीत तसे हे परमेश्वराचे पृथग्विध भाव आहेत.

संसारात ज्या काही क्रिया, पदार्थ, घटना इ० आहेत ते भगवंताचेच रूप आहे. मग उत्पत्ति होवो अथवा प्रलय होवो. अनुकूलता वा प्रतिकूलता येवो, अमृत किंवा मृत्यु असो, स्वर्ग वा नरक असो ही सर्व भगवंताची लीला आहे. या सर्वांच्या मुळाशी एक परमात्मतत्त्व आहे.

(६) लोकमहेश्वर संज्ञेचा अधिक विस्तार

सप्तर्षी - भृगु, मरीचि, अत्रि, पुलस्त्य, पुलह, क्रतु, वसिष्ठ। वसिष्ठ हे मित्रावरुण आणि उर्वशी यांच्या पोटी जन्मले. वस धातूवरून श्रेष्ठतादर्शक वसिष्ठ हे नाव तयार झाले. महर्षी वसिष्ठांनी समाजाची आदर्श रचना करून दाखवली. पूर्वे चत्वारः — सनक, सनत्कुमार, सनंदन, सनातन हे चारही ब्रह्मदेवाच्या तप करण्याने सर्वात प्रथम प्रगट झालेले आहेत. हे चारही भगवत्स्वरूप आहेत. सर्वात प्रथम प्रगट होऊनही हे चारही नित्य पाच वर्षांच्या अवस्थेत बालकरूपानेच राहत असतात. हे तिन्ही लोकात भक्ती, ज्ञान आणि वैराग्याचा प्रचार

Notes

| 2011 | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| JAN | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

www.madhaveeraghuveer.com

करत फिरत असतात. यांच्या वाणीतून नित्य हरिः
शरणम् । याचा उच्चार होत असतो. हे भगवत्कथेचे
फार प्रेमी आहेत म्हणून या चारांपैकी एक वक्ता व
तिघे श्रोता होऊन भगवत्कथा सांगत व ऐकत असतात.

मनवः - ब्रह्मदेवाच्या एका दिवसात चौदा मनु होतात.
आता सातव्या मनूचा काल सुरु आहे. हे सर्व
ब्रह्मदेवाच्या आज्ञेने सृष्टीचे उत्पादक व प्रवर्तक आहेत
स्वतः भगवानच सृष्टीरचनेसाठी ब्रह्मदेवरूपाने
प्रकट झाले आहेत. म्हणून सात महर्षि, चार सनकादिक
आणि चौदा मनु या पंचवीसांना ब्रह्मदेवाचे
मानस पुत्र म्हटले आहे.

येषां लोक इमाः प्रजाः - संसारात दोन प्रकारची प्रजा
आहे. स्त्री पुरुषांच्या संयोगाने उत्पन्न होणारी ती
बिंदुज आणि शब्दाने (दीक्षा, मंत्र, उपदेश) उत्पन्न
होणारी ती नादज. बिंदुज प्रजा पुत्रपरंपरेने तर
नादज प्रजा शिष्यपरंपरेने चालत असते.

(6) पश्य मे योगमैश्वरम्. माझ्या या ईश्वरी योगाला पहा.
असे भगवंत ९-५ आणि ११.८ मध्ये म्हणतात.
"जो ह्या विभूति आणि योग तत्वतः जाणतो तो
अविचल भक्तियोगाने युक्त होतो यात संशय नाही!"
असे इथे म्हणतात. असे हे परमेश्वराचे ऐश्वर्य जाणून
घेतले पाहिजे. ते जो यथार्थपणे जाणतो त्याला निश्चल
योग प्राप्त होतो. त्याला ब्रह्मज्ञान होऊन तो स्थिरचित्त होतो.

*Notes*

विभूति - विश्वातील सूक्ष्म तत्त्व
योग - व्यक्तितील सूक्ष्म तत्त्व

सर्वत्र एकच एक परमात्मतत्त्व आहे असे म्हटले तर तत्त्वचिंतन घडणे अशक्य आहे. चिंतनासाठी किंवा वाटचालीसाठी दोन बिंदू लागतात.
भगवंत म्हणतात - मी परमात्मा सर्वत्र असलो तरी काही ठिकाणी किंवा काही व्यक्तींमध्ये माझे रूप अधिक प्रकट होते, त्या विभूती होत. योगी आणि विभूती असे दोन बिंदू मिळाले की उपासना होऊ शकते. योग्याची अंतिम परमात्मतत्त्वाकडे वाटचाल या विभूतींच्या माध्यमातून होऊ शकते. योग्याने विश्वातील विभूतिंमध्ये परमात्मतत्त्व पहावे.
भौतिक व्यवहारातील उदाहरण - जसे रुपयामुळे सर्व वस्तू मिळतात असे मानून सामान्य मनुष्य रुपयालाच महत्त्व देतो आणि रुपयाविषयी त्याच्या मनात आकर्षण निर्माण होते तसेच जो काही प्रभाव, महत्त्व दिसते ते सर्व भगवंताचेच आहे असे जाणल्यामुळे मनुष्याची भगवंतात दृढ भक्ती निर्माण होते.
एका भगवंताशिवाय दुसरी सत्ता नाहीच हे जाणल्यामुळे दृढ श्रद्धा, अविचल भक्ती उत्पन्न होते यात मुळीच संशय नाही.

(८) परमात्माच आदिकारण आहेत. परब्रह्म सर्व जगाचे उत्पत्तिकारण म्हणजेच कुंभाराप्रमाणे निमित्तकारण आहेत.

*Notes*

| 2011 | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| JAN | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

www.madhaveeraghuveer.com

आणि मृत्तिकेप्रमाणे उपादान कारणही आहेत. तसेच सर्व जगाच्या नाशही परब्रह्माच्या ठायीच होतो. हे परमतत्त्व बुध जन विवेकाने जाणतात आणि प्रेमयुक्त होऊन केवळ परब्रह्माचेच भजन करतात. त्यांचा व्यवहार विश्वात्मक होतो.

जे जे भेटे भूत। ते ते मानिजे भगवंत।
हा भक्तियोगु निश्चित। जाण माझा॥ १०.११८॥

भगवंत म्हणतात – मत्तः परतरं नान्यत्। ७.७
सर्वभूतानां सनातनं बीजं मां विद्धि। ७.१०
अहं बीजप्रदः पिता। १४.४

सर्वस्य आणि सर्वम् अशी दोन समानार्थी पदे देण्याचे कारण म्हणजे या सृष्टीचा कोणी उत्पादकही नाही आणि संचालकही नाही. जे आहे ते केवळ भगवंतच। भगवंतात तल्लीन होणे हेच खरे भजन।

(९) असे निरंतर माझ्या ठिकाणी मन लावणारे आणि माझ्यातच प्राणांना अर्पण करणारे भक्तजन परस्परांना माझ्या प्रभावाचा बोध करीत व गुण, प्रभाव यासह माझे कीर्तन करीत संतुष्ट होतात व मज वासुदेवाच्या ठिकाणीच रममाण होतात.
ईश्वरार्पण बुद्धीने त्यांना अलभ्य लाभ होतो व निरपेक्ष सुख संतोष मिळतो, त्यांना तृष्णाक्षय घडतो चित्तात सहजानंद स्थिरावू लागतो. त्यांच्या भक्तीचा ऐक्यरस संगम घडतो. स्वर्गसुखही क्षुद्र वाटू लागते.

Notes अशा प्रकारचा सहजानंद चित्तात स्थिरावू लागला म्हणजे संतोषव्रत पक्व होत चालले आहे असे समजावे.

| T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | | | | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | | | | FEB |

★ या श्लोकात सहा गोष्टी आहेत. त्यापैकी मच्चित्ता: मद्गतप्राणा: या गोष्टी भक्ताने स्वत: करण्याच्या आहेत. बोधयन्त: आणि कथयन्त: या दोन गोष्टी आपसात भेटल्यावर होत असतात. तसेच तुष्यन्ति व रमन्ति ह्या दोन गोष्टी फल-स्वरूपाने मिळत असतात.

एकस्तपो द्विरध्यायी असे वचन आहे. तप, ध्यान, साधना एकट्याने एकांतात करण्याची गोष्ट आहे. मात्र अध्ययन करताना दुसऱ्याची आवश्यकता असते. नाहितर अभ्यास एकांगी होतो. परस्परांना सांगण्याने, शिकवण्याने, समजावून सांगण्याने आपला अभ्यास पक्का होतो.
Teaching is the best way of learning.

मच्चित्ता: - इथे मन आणि चित्त एकरूप आहे. भगवंताशी जेवढा संबंध जोडावा तितकी आपुलकी निर्माण होते. आत्मीयता येते.

मद्गतप्राणा: - शरीराच्या जेवढ्या क्रिया आहेत त्यात प्राणाची मुख्यता असते. भक्ताचे जगणे भगवंतासाठी असते. त्यांच्या क्रियेत क्रियाभेद असतो पण उद्देशभेद नसतो.

बोधयन्त: परस्परम - भक्तांना भगवद्भाव, रुची असणारे जेव्हा भेटतात तेव्हा त्यांच्यात त्याविषयी चर्चा होते. मग ते परस्परात एक दुसऱ्याला भगवंताचे तत्त्व, रहस्य, गुण, प्रभाव जाणवून देतात

Notes

| 2011 | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| JAN | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

www.madhaveeraghuveer.com

तेव्हा एक विलक्षण सत्संग होत असतो. त्या भक्तांना भगवंताच्या लीलेत कथेत नित्य नावीन्य वाटते. भक्त एकमेकांमध्ये भावाचे आदान प्रदान करतात.

कथयन्तश्च माम् - भगवंताच्या भक्ताला कोणी ऐकणारा भेटला तर ते त्याला भगवंताचे गुणवर्णन ऐकवतात आणि सांगणारा भेटला तर ते त्याच्याकडून ऐकतात. मात्र तिथे वक्तेपणाचा अभिमान नसतो किंवा श्रोतेपणाची लाज वाटत नाही.

तुष्यन्ति च रमन्ति च - त्यांच्या संतुष्टीचे कारण भगवंतच असतात. भगवान आणि भक्तात परस्पर प्रेमाची लीला अनंत काळपर्यंत चालत राहते आणि प्रेम प्रतिक्षण वाढतच जाते.

(१०) चित्तवृत्ती - प्रमाण, विपर्यय, निद्रा, विकल्प, स्मृती यांचा पूर्ण निरोध होऊन पिंड व ब्रह्मांड यांचे ऐक्य आत्मज्ञानी अनुभवतात. ऐक्याची ही अनुभूती म्हणजेच बुद्धियोग होय.

अशा सततयुक्त, भगवंतामध्ये रममाण असणाऱ्या आणि प्रेमाने भगवद्भजन करणाऱ्या भक्तांना मी बुद्धियोग देतो. मान-अपमान, सुख-दुःख, नफा-नुकसान स्वास्थ्य-अनारोग्य अशा परस्परविरोधी परिस्थितीतही ते सम राहू शकतील असा (बुद्धियोग) मी त्यांना देतो. देतो म्हणजे परमेश्वर कुणीतरी वेगळा आणि तो काहीतरी वस्तू देतो असा याचा अर्थ नाही.

www.madhaveeraghuveer.com

Notes

| T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | • | • | • | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | • | • | • | FEB |

परमात्मा आत्मारूपाने हृदयात आहेच. परंतु अहंकारामुळे आपणास 'आपण व विश्व' यात एकात्मता जाणवत नाही. तो अहंभाव जाताच आत्मभाव उदित होईल. आत्मभाव जागा होताच स्थिरबुद्धी प्राप्त होईल. आणि त्यानंतर सर्व एकात्मताच दिसेल. अज्ञानामुळे विविधता दिसते तर ज्ञानाने एकात्मतेचे दर्शन घडते. असे लोक भगवंताला प्राप्त होतात, म्हणजे त्यांच्या ठिकाणी उणीवा उरत नाहीत तर त्यांना पूर्णतेचा अनुभव होतो.

(११) त्या भक्तांवर अनुग्रह करण्यासाठी मी त्यांच्या अज्ञानातून निर्माण झालेला अंधकार तेजस्वी ज्ञानदीपाने नष्ट करतो. आत्मभावावर स्थिर झालेली बुद्धी हाच ज्ञानदीप आहे.

ज्या अज्ञानामुळे 'मी कोण, माझे स्वरूप काय?' असा जो अज्ञानीपणा राहतो त्या अज्ञानाचा मी नाश करतो, अर्थात तत्वबोध करतो. त्यांच्या चित्तवृत्ती अत्यंत शुद्ध होऊन आत्माकार होतात. मिथ्या देहाभिमानाच्या तमाचा नाश या ज्ञानदीपाने होतो.

या ज्ञानदीपात भक्तीच्या प्रसन्नतेचे तेज असते. ईश्वराप्रती असलेल्या शुद्ध भावाचा वायू या दीपाला प्रज्वलित करतो. शुद्ध प्रज्ञा ही या दिव्याची ज्योत आहे. वैराग्ययुक्त अंतःकरण म्हणजे पणती होय. आणि प्रज्ञेमुळे होणारे सम्यक्दर्शन म्हणजे या दिव्याचा

Notes निर्मल प्रकाश आहे.

www.madhaveerguruveer.com

| 2011 | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| JAN | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

(१२) (१३) भक्तावरील भगवंताची ही अलौकिक आणि विलक्षण कृपेची गोष्ट ऐकून व त्याने प्रभावित होऊन अर्जुन भगवंताची स्तुति करतात.

निर्गुण निराकार - परं ब्रह्म।
सगुण निराकार - परं धाम।
सगुण साकार - पवित्रं परमं भवान्।

आपणाला सर्व ऋषिमंडळी सनातन दिव्य पुरुष, देवांचाही आदिदेव अजन्मा आणि सर्वव्यापी म्हणतात याचप्रमाणे देवऋषी नारद असित व देवलऋषी तसेच व्यास महर्षि व स्वतः आपणही मला हेच सांगत आहात.

महर्षी व्यासांनी आपल्याला शाश्वत (२.२०) दिव्य पुरुष (८.१०) आदिदेव (१०.२) अज (७.२५), (१०.३) विभु (९.४) असे म्हटले आहे.

(१४) ब्रह्मदेव वा रुद्र वा देव यांनाही भगवंताच्या रुपाचा पार लागत नाही तर सामान्य माणसाला त्या ईश्वराचे यथार्थ रुप उलगडू नये यात काहीच आश्चर्य नाही.

केशव - क म्हणजे ब्रह्मदेव
अ म्हणजे विष्णु
ईश म्हणजे शंकर
व म्हणजे वपु अर्थात स्वरुप

ब्रह्मा विष्णु महेश यांचे स्वरुप आहे त्याला केशव म्हणतात. आपणच संसाराची उत्पत्ती, स्थिती आणि संहार करणारे आहात या अर्थी इथे 'केशव' हे संबोधन आले आहे.

Notes

SUNDAY 30

| T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | FEB |

www.madhaveeraghuveer.com

8.00 ऋत म्हणजे आतापर्यंत आपण जे सांगत आहात ते
आणि एतत् म्हणजे आता सांगत आहात ते मी
9.00 सर्व सत्य आहे असे मानतो. इथे अर्जुन 'ऋत'
म्हणजे सत्य असे म्हणून विश्वास प्रगट करतो.
10.00 आपल्या प्रगट होण्याला देव किंवा दानवही
जाणू शकत नाही. राक्षस फार विलक्षण मायावी
11.00 असतात त्यामुळे ते विचित्र प्रभाव दाखवू शकतात.
परंतु त्या माया शक्तीमुळे ईश्वराला जाणू शकत नाही.
12.00 भगवंतासमोर राक्षसांची माया कुंठित होते.
तात्पर्य मानव, देव, राक्षस इ. कोणीही आपल्या
1.00 शक्तीने, सामर्थ्याने, योग्यतेने, बुध्दीने भगवंताला
जाणून घेऊ शकत नाही. भगवंतापाशी बुध्दीचे
2.00 चमत्कार, सिध्दी चालू शकत नाही.

3.00 (१५) या श्लोकात पाच संबोधने (सर्वाधिक) आली आहेत
भूतभावन भूतेश देवदेव जगत्पते पुरुषोत्तम
4.00 सूर्य शिव गणेश शक्ती विष्णु
अर्जुनाच्या मनात भगवंताविषयी विशेष प्रेम
5.00 उचंबळून आले आहे. Excitement
या श्लोकाचा भाव असा आहे की जसे भगवंत
6.00 स्वतःच स्वतःला जाणतात तसेच त्यांचा अंश
असलेल्या जीवानेही स्वतःच स्वतःला अर्थात
7.00 स्वरूपाला जाणून घेतले पाहिजे.

Notes

| 2011 | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| JAN | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

(१६) आत्मविभूतय: हे पद महत्वाचे आहे. चराचर सृष्टीत केवळ परमात्माच आहे. त्यामुळे विभूतींना पृथक सत्ता नाही. त्या परमेश्वराचेच रूप आहे. या विभूती दिव्य आहेत. त्यामुळे ज्ञात्या मंडळींनाही त्या सर्वार्थाने उलगडत नाहीत. त्यामुळे त्या विभूती ज्याच्या आहेत त्याच्याकडूनच जाणणे इष्ट आहे.

अर्जुन हा भगवंतांचा सखा आहे. त्यामुळे आपणच या विभूति उलगडून सांगाव्यात असा धारिष्ट्यपूर्ण लाडिक हट्ट अर्जुनाने धरला आहे.

भगवंतांच्या या दिव्य विभूती आपण अशेषत: (काही शिल्लक न ठेवता) सांगाव्यात अशी इच्छा अर्जुनाने प्रगट केली आहे. त्यामागील कारण स्पष्ट करताना तो म्हणतो!

(१७) निरंतर चिंतन करीत मी आपणाला कशा रीतीने जाणावे? आणि कोणकोणत्या भावांनी आपण चिंतन करण्यास योग्य आहात?

इथे योगी आणि भगवंत अशी संबोधने वापरली आहेत.

अर्जुन श्रीकृष्णाला जाणत होते, पण त्यांच्या समग्र रूपाला जाणत नव्हते. परंतु ते जाणून घेण्याची जिज्ञासा होती.

विभूती या गौण नाहीत तर मुख्य आहेत. विभूतिरूपाने साक्षात भगवानच आहेत.

*Notes*

| T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | FEB |

www.madhaveeraghuveer.com

(१) जसे भुकेल्याला अन्न आणि तहानलेल्याला पाणी गोड वाटते तसेच जिज्ञासु अर्जुनाला भगवंतांचे वचन फार विलक्षण वाटते.

भगवंताच्या विभूतींच्या आणि अर्जुनाच्या विभूती ऐकण्याच्या आवडीचा अंतच नाही. कानांनी अमृतमय वचन कितीही ऐकले तरी तृप्ती होत नाही.

इथे अर्जुन जनार्दन या नावाने संबोधतो. अर्द म्हणजे याचना किंवा प्रार्थना करणे. अभ्युदय किंवा निःश्रेयस यासाठी जन भगवंताची प्रार्थना करतात म्हणून तो जनार्दन!

अशा या जनार्दनाला अर्जुन विनवतो - आपणास विचारलेल्या गोष्टींची पुनरुक्ती झाली तरी तुम्ही पुन्हा पुन्हा सांगा. रोज उगवणाऱ्या सूर्याला शिळा म्हणता येईल का? अग्नीने स्नान केले नाही म्हणून अग्नीला ओवळा म्हणता येईल का? वाहणाऱ्या गंगेच्या पाण्याला पारोसेपणा येतो का? तुम्ही आपल्या मुखाने जे बोललात ते मूर्तिमंत नादब्रह्म आम्ही अनुभवले. तुमच्या मुखाने बोधाच्या गोष्टी ऐकणे म्हणजे चंदनाच्या झाडाच्या फुलांचा वास घेणे आहे.

अर्जुनाच्या या बोलण्याने कृष्ण सर्वांगाने डोलला आणि म्हणाला - हा अर्जुन भक्ती व ज्ञान यांचा मळा झाला आहे.

www.madhaveeraghuveer.com

Notes

| 2011 | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| FEB | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 |

१८ जून २०१२

विभूतियोग म्हणजे सृष्टीच्या जवाहिराचे ज्ञान होणे. सृष्टीत मांगल्यदर्शन झाले तर भगवद्‌दर्शनही होईल. त्यासाठी जीवनातील मंगल गोष्टी पहाण्याची सवय करायला हवी. आज आपण केवळ दोषच पहातो. प्रथम दोष दृष्टी काढून टाकून अनसूय व्हायला हवे. प्रथम Good Seeing म्हणजे मंगल दर्शन व नंतर God Seeing म्हणजे परमात्मदर्शन आपोआप जीवनात येईल. आपली दृष्टी गुणग्राही झाली तर निश्चितच Good is everywhere & God is everywhere सर्वत्र मांगल्य आहे व सर्वत्र भगवंत आहे असा अनुभव येईल. संपूर्ण जगच विभूति आहे, व्यक्ती नाही.

हे अर्जुना, तुझ्या दृष्टीत जितक्या विभूति समजण्याची शक्ती असेल तितके जग तुला विभूतिमान वाटेल. त्यापैकी काही विभूति मी तुला उलगडून दाखवतो. सर्व विभूति सांगणे शक्य नाही म्हणून मुख्य मुख्य विभूति तुला मी सांगेन.

इथे सुरुवातीला भगवंत आनंददर्शक होऊन या अध्यायाने प्रारंभ करीत आहेत. अर्जुनाने विस्ताराने विभूति जाणून घेण्याची इच्छा प्रगट केली आहे. त्याची तळमळ, जिज्ञासा जाणून भगवंत आनंदित झाले आहेत. मात्र अर्जुनाने आपल्या विभूति अशेष (काही शिल्लक न ठेवता) सांगा असे म्हटले तरी भगवंत संक्षेपाने काही मोजक्याच विभूति सांगणार आहेत. साधकाने किंचितही आपला आग्रह, अहंकार न ठेवता

Notes

| T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | MAR |

www.madhaveeraghuveer.com

Chinese New Year Holiday (SG)

आपले सामर्थ्य बुध्दी न लावता भगवंतावरच संपूर्णपणे निर्भर रहावे. त्यातून जे मिळते ते अपार असते याचा प्रत्यय पुढील अध्यायात येतो. अकराव्या अध्यायात अर्जुन सावध होऊन नम्रतेने एक रूप दाखवण्यासाठी प्रार्थना करतो. आपले अज्ञान आणि अयोग्यता प्रगट करीत भीतभीत भगवंतांचे अव्यय रूप पहाणे शक्य आहे का? अशी विनंती करतो तेव्हा भगवंत आपले विराट स्वरुप पहाण्यासाठी दिव्य चक्षु देतात.

म्हणजेच भक्त जे मागेल ते आणि तेवढे त्याला मिळेलच असे नाही. कधी कमी तर कधी अपेक्षेपेक्षा खूप जास्त ही मिळते. भक्ताला काय, किती आणि कधी द्यायचे हे भगवंतच जाणतात.

अर्जुनाच्या मनात विभूति जाणून घेण्याची जिज्ञासा जागी झाल्याने ते प्रसन्न होऊन त्याला कुरुश्रेष्ठ असे म्हणतात. बुध्दियोगाने जीवनाचा दृष्टीकोण बदलतो.

दिव्य - जडापासून भिन्न, स्फूर्तिमय, प्रकाशयुक्त.

या विभूती सांगण्याचा हेतु
मंदाधिकाऱ्यास सगुणोपासनेसाठी
शुध्दाधिकाऱ्यास निर्गुण साक्षात्कारासाठी
उपयोगी आहे.

(२०) मी सर्व प्राणिमात्रांच्या अंतःकरणातील आत्मा आहे.
आशय - हृदय

www.madhaveeraghuveer.com

Notes

| 2011 | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| FEB | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 |

8.00 मीच आदि (उत्पत्ती) मध्य (स्थिती) अंत (लय) आहे.
जो ज्ञानयोगी आहे त्याच्यासाठी सर्व भूतांच्या अंतरी
9.00 रहाणारा आत्मा म्हणून परमात्म्याचे वर्णन केले आहे.
आणि भक्तीमार्गी साधकासाठी सर्वशक्तिमान ईश्वराचे
10.00 स्वरुप उत्पत्ती-स्थिती-लय यांचे अधिष्ठान म्हणून
स्पष्ट केले आहे.
11.00 आदिः, अन्तः - पुल्लिंगी रुप मध्यम - नपुंसकलिंगी
सुरुवातीला आणि शेवटी एकटे परमपुरुष भगवान असतात
12.00 मात्र मध्यात म्हणजे सृष्टीत तिन्ही लिंगात व्यक्ती, वस्तू
पदार्थ, क्रिया, भाव रहात असतात. नपुंसकलिंगात तिन्ही
1.00 लिंगे अंतर्भूत असतात.

2.00 (२१) बारा आदित्य हे प्रातिनिधिक आहेत. ती बारा
मासांची प्रतीके आहेत. त्यातला विष्णु हा सर्वश्रेष्ठ
3.00 आहे. तो कार्तिकाचा स्वामी आहे. कारण आषाढी ते
कार्तिकी भगवंतांचे शयन होते व कार्तिकी महिन्यात
4.00 ते जागे होतात. सृष्टीला जागे करतात. पावसाळा
सरलेला असतो. पुन्हा सूर्याची किरणे पृथ्वीमातेला
5.00 दिसायला लागतात.
धाता, मित्र, अर्यमा, शुक्र, वरुण, अंशु, भग,
6.00 विवस्वान, पूषा, सविता, त्वष्टा व विष्णु अशी
बारा आदित्यांची नावे आहेत. याशिवाय स्कंद पुराणात
7.00 आलेली आदित्यांची बारा नावे वेगळी आहेत.

*Notes* SUNDAY 6

G - Generator
O - Operator } GOD
D - Destroyer

| T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | MAR |

www.madhuveeraghuveer.com

सूर्यनमस्कारातही १२ आदित्यांची नावे आहेत.
१. मित्र - जगमित्र २ रवी - सर्वांना पूजनीय
३ सूर्य - विश्वसंचालक. ४ भानू - तेज देणारा
५. खग - इंद्रिये समर्थ करणारा ६. पूषा - पोषण कर्ता
७. हिरण्यगर्भ - वीर्यबलवर्धक ८. मरीचि सर्वरोगनाशक
९. आदित्य सर्वाकर्षक १० सावितृ - सर्वोत्पादक
११ अर्क - आदरणीय १२. भास्कर - प्रकाशमान
ही सर्व विष्णूचीच विविध रूपे आहेत.

मरुदगणात मी "मरीचि" आहे असे भगवंत म्हणतात आवह, प्रवह, विवह, परावह, उदवह, संवह आणि परिवह असे सात प्रधान मरुदगण आहेत. त्यांचा नायक, त्यांचे मुख्य तेज मी मरीचि आहे.

इंद्राकडून दितीच्या गर्भाचे सात तुकडे केल्यानंतर त्या सातांचे पुन्हा सात - सात तुकडे केल्यावरही ते मेले नाहीत, तर एकापासून एकोणपन्नास झाले. त्या सर्व वायुदेवता आहेत.

चंद्र, नक्षत्रे, तारा, अग्नी इ० सर्व प्रकाशमान वस्तूंना ज्योती म्हटले जाते, परंतु या सर्व प्रकाशमान वस्तुमध्ये भगवंताचे सर्वश्रेष्ठ रूप म्हणजे "सूर्य" आहे. आणि तो सुद्धा अंशुमान म्हणजे किरणांनी युक्त तेजस्वी सूर्य आहे.

नक्षत्रस्वामी "चंद्र" मी आहे. न क्षरति म्हणजे जे क्षय पावत नाही. ते नक्षत्र. 'चदि आल्हादने' या आल्हादक धातूवरून हा शब्द बनला आहे चंद्राला मनाची देवता

*Notes*

| 2011 | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| FEB | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 |

www.madhaveeraghuveer.com

विराट पुरुषाच्या मानले जाते तो, मनापासून उत्पन्न झाला. सत्तावीस नक्षत्रांचा स्वामी हा चंद्र आहे.

चंद्रदर्शनाने कविमनाला स्फुरण चढते. चंद्राच्या कलेनुसार समुद्राला भरती-ओहोटी येते. तरुणांच्या प्रेमाला भरते येते. तर लहान मुलांचा तो चांदोमामा होतो. ज्या स्त्रियांना भाऊ नाही अशा स्त्रिया चंद्राला आपला भाऊ मानतात. वनस्पतींमधील औषधी द्रव्यांचे पोषण चंद्रच करतो. चंद्रप्रकाशात औषधी गुणांची परिणामकारकता वाढते. चंद्रावर ससा असल्यासारखे वाटते म्हणून त्याला शशांक म्हणतात. मयंक, रजनीनाथ, निशिकांत, शशी इ.

(२२) ऋग्वेदातील सारभूत निवडक ऋचा सामवेदात अंतर्भूत केल्या आहेत. आणि सामवेद हा गायला जातो. शब्दांपेक्षा स्वरांचे प्राधान्य व सामर्थ्य अधिक आहे. सुरांमध्ये अशी ताकद आहे की ती परमेश्वराला डोलायला लावते. जिथे श्रद्धायुक्त गायन आहे, भजन आहे तिथे ईश्वराचा वास असतो.

नाहं वसामि वैकुण्ठे योगिनां हृदये रवौ।
मद्भक्ता यत्र गायन्ति तत्र तिष्ठामि नारद॥

म्हणून वेदांमध्ये सामवेदाला विभूतिमत्व प्राप्त झाले.

देवांचा राजा इंद्र - स्वरूपवान, आजानुबाहू. तो नित्य सुंदर, नित्य तरुण, अमर आहे. सद्गुणांनी युक्त आहे. बुद्धीने तीक्ष्ण, कांतीने परिपूर्ण आहे. सर्व भुवनांचा

*Notes*



www.madhaveeraghuveer.com

एकमेव राजा आहे. त्याने जन्मल्याबरोबर आईचे स्तनपान केले नाही तर सोमरसपान केले. त्यामुळे त्याला अपार आणि अजिंक्य सामर्थ्य प्राप्त झाले. सोमरस हे स्वादिष्ट, रुचिकर, आल्हाददायक बुद्धीला तरतरी देणारे पेय आहे. याच्या सेवनाने तात्काळ स्फूर्ति निर्माण होते. इंद्र अतिशय पाणिदार, शूर, सत्यस्वरूप, उदार, दानशूर, अनंतवीर्य आहे.

अस्त्र - विश्वविजयी, प्रखर आणि उग्र असे वज्र हे त्याचे प्रमुख अस्त्र आहे. हे पोलादी असून त्याला सहस्र धारा आहेत. शंभर टोके आहेत. शिवाय भाला खड्ग ही आहे.

रथ - इंद्राचा रथ अतिशय देदीप्यमान, बळकट व टणकट आहे. तो मनापेक्षाही गतिमान आहे. हा रथ सुदृढ असून बसायला सुखकर आहे. रथाला जोडावयाचे घोडेही सुंदर व समर्थ आहेत. ते नेहमी सज्ज असतात. कधीही थकत नाहीत. त्याचा चाबूकही सोन्याचा आहे.

महिमा - इंद्राचा महिमा अपरंपार आहे.

पराक्रम - इंद्र हा आर्यांचा रक्षणकर्ता आहे. त्याच्या कृपाप्रसादानेच आर्यांचे पाय भारतभूमीत स्थिर झाले. हे त्याचे महदुपकार स्मरून अनेक वैदिक ऋषींनी त्याला ऋग्वेदात राष्ट्रदेव बनवून त्याला प्रमुख स्थान दिले. आणि अनेक सूक्तांमधून त्याला परंपराने आळवले व यज्ञसमारंभातून नाना तऱ्हेचे

www.madhaveeraghuveer.com

Notes

स्वस्ति न इन्द्रो वृद्धश्रवाः।

हविरन्न अर्पण करून आपली स्वामिनिष्ठा व कृतज्ञता व्यक्त केली आहे.

इंद्र ही सर्वश्रेष्ठ वैदिक देवता आहे. ऋग्वेदातील १०३२ सूक्तांपैकी सुमारे दोनशे सूक्ते इंद्राविषयी आहेत याशिवाय अन्य पन्नास सूक्तांमध्ये इंद्राला आवाहन केले आहे. यावरून इंद्रदेवतेचा अधिकार आणि थोरवी ध्यानात येते.

विश्वाचे पृथ्वी, अंतरिक्ष व आकाश असे तीन उपविभाग मानल्यास इंद्र हा अंतरिक्षाचा स्वामी आहे. पृथ्वी व आकाश यांच्यामध्ये असलेले अंतरिक्ष हे मध्यमस्थान होय. इथे वास करणारी प्रधान देवता इंद्र हा सर्वाधिक पराक्रमी आहे.

इंद्र हा कश्यप व अदितीचा पुत्र आहे. देवेन्द्र, शक्र, पुरंदर, सहस्राक्ष, वासव, मघवन् ही त्याची इतर नावे आहेत. याच्या पत्नीचे नाव शची असून याला जयंत, ऋषभ आणि मीढुष असे तीन पुत्र झाले.

सर्व इंद्रियांमध्ये मन हे माझी विभूति आहे. पाच कर्मेंद्रिये, पाच ज्ञानेंद्रिये व मन हे अकरावे इंद्रिय आहे. मनाचे सामर्थ्य अद्भुत आहे.

मन एव मनुष्याणां कारणं बन्धमोक्षयोः।

ज्ञानेश्वर माउली म्हणतात -

जे विवेकाचे मुकुटी। संतोषाची चाड तानी।
मेरुसीजे सरी पैडती। नाही दिशा॥

तुकाराम महाराज म्हणतात - मन करा रे प्रसन्न
सर्व सिद्धींचे कारण।

Notes

| T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | MAR |

तर नामदेव महाराज, मनावर रागावले आहेत कुठे मला फरपटून नेलोस असे म्हणत मनाला

अरे अरे माझ्या मना अळगटा। अशी शिवी देतात. अळगट म्हणतात. तर एकनाथ महाराज भागवतात म्हणतात.

सर्व इंद्रियांचे चालका। ते मुख्यत्वे मनाचि (एक)

असे प्रत्येक संतांनी या मनाचे वर्णन केले आहे. समर्थांनी तर मनोबोधच लिहिला. बाकी सगळ्या संतांनी मनाला फारच झोडपले म्हणून समर्थ म्हणतात.

मना सज्जना भक्ती पंथेचि जावे।

बहिणाबाई म्हणतात

मन एवढं एवढं जसा खाकसाचा दाणा।
मन केवढं केवढं याला आभाळ मायेना।

भगवद्गीतेत अर्जुनही म्हणतो.

चंचलं हि मनः कृष्ण प्रमाथि बलवद्दृढम्।
तस्याहं निग्रहं मन्ये वायोरिव सुदुष्करम्॥

संत कबीर म्हणतात - मनावर काबू ठेवणाऱ्याला जितेंद्रिय म्हणतात. अशा साधकांना कित्येकदा 'गोस्वामी' असेही म्हटले जाते. गो म्हणजे इंद्रिये. अशा इंद्रियांचा जो दास नाही, स्वामी आहे तो गोस्वामी असा एखादाच मनावर नियंत्रण ठेवतो.

मन के बहुतक रंग है, छिन छिन बदले सोय।
एकै रंग में जो रहे, ऐसा बिरला कोय॥

चंचल मनाला काबूत ठेवून त्याला ईश्वराच्या रंगात जो रंगवून टाकतो असा मनुष्य विरळाच असतो.

Notes

| 2011 | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| FEB | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 |

www.madhaveeraghuveer.com

8.00 असे अनेक संतांनी मनाचे वर्णन केले आहे सर्व
इंद्रियात मन मुख्य आहे.

9.00 मन: षष्ठानीन्द्रियाणि प्रकृतिस्थानि कर्षति।

जर मनाची साथ नसेल तर इंद्रियांसमोर विषय
10.00 आले तरी विषयांचे ज्ञान होत नाही. मनाची ही
विशेषता भगवंतापासूनच आली आहे म्हणून मनाला
11.00 भगवंतांनी आपली विभूति म्हटले आहे.

मनाचे इतके दुर्गुण असले तरी त्या मनाचे
12.00 वैशिष्ट्य हे आहे की त्याला जिथे नेऊ तिथे ते जाते.
एखाद्या ठिकाणी चिकटूनही बसते मग त्याला ईश्वराच्या
1.00 भजन कीर्तनात नेले तर तिथेही ते चिकटते. त्याच्या
या लक्षणाचा उपयोग करून घेता यायला हवा. असे
2.00 झाले तर जे मन कर्मबंधनाला कारण ठरते तेच
मोक्षाच्या मार्गीही सुलभ करून देईल.

3.00 मन हे Killing knife होऊ शकते तसेच ते
Healing knife ही होऊ शकते. विकारी मन जर
4.00 अविकारी, शुद्ध झाले तर आपली उन्नती होऊ शकते.

5.00

6.00

7.00

*Notes*

SUNDAY 13

| T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | MAR |

www.madhaveeraghuveer.com

संपूर्ण प्राणिमात्रांमधील चेतना मीच आहे. सर्व प्राण्यांमध्ये जी प्राणशक्ती, चैतन्य असते त्या शक्तीला भगवंत आपली विभूति मानतात. मृत व्यक्तीचा देह, इंद्रिये जागेवर असली तरी त्यात चेतनाशक्तीचा अभाव असतो.

या देवी सर्वभूतेषु चेतनारूपेण संस्थिता।
नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमो नमः।

(२३) ऋग्वेदातील १०२८ सूक्तांपैकी फक्त तीन सूक्ते रुद्राविषयी आहेत. त्या काळी तेवढे महत्वाचे स्थान रुद्रास नव्हते. मात्र आज हिंदु देवतांमध्ये रुद्राला मान्य स्थान आहे. घरोघरी रुद्राभिषेक चालतात. उपासना असते. रुद् धातूचा अर्थ रडविणे असा आहे. मात्र रुत शब्दाचा अर्थ ज्ञान असाही आहे. रुद्र हा रागीट देव असून त्याचा कोप होऊ नये म्हणून त्याची प्रार्थना करतात. रुद्र ११ आहेत. त्यांची नावे वेगवेगळी आढळतात.

वेदातील रुद्र देवतेचाच विकास शिव, शंकर रूपाने पुराणसाहित्यात झाला आहे. शं करोति इति शंकरः रुद्रामध्ये शंकर ही विभूती आहे तर यक्ष व राक्षस यांच्यामध्ये धनपती कुबेर ही विभूती आहे. कुबेर हा उत्तर दिशेचा स्वामी आहे. अलकानगरी ही त्याची राजधानी आहे. कुबेर हे ईश्वराच्या वैभवाचे प्रतीक आहे. देवपूजेनंतर जी मंत्रपुष्पांजली म्हणतात

Notes

| 2011 | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| FEB | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 |

www.madhaveeraghuveer.com

*Id-el Moulud (The Prophet's Birthday)*

तीमध्ये कुबेराला राजाधिराज, महाराज, कामेश्वर, वैश्रवण इ० नावांनी संबोधून त्याची सानंद प्रार्थना केली जाते.

कुबेर हा यक्षांचा अधिपती आहे. यक्ष ही एक अतिमानवी योनी आहे. प्रजापतीने जल आणि प्राणी निर्माण केले त्याचबरोबर त्यांच्या संरक्षणासाठी काही मानवसदृश जीव निर्माण केले. जन्मताच हे महान भूक म्हणून ओरडू लागले. ब्रह्मदेवाला वाटले की हे आता आपण निर्मिलेल्या प्राणिसृष्टीला खातील म्हणून ब्रह्मदेवाने त्यांना आदेश दिला – 'रक्षध्वम' – रक्षण करा. पण त्यांच्यापैकी काहींनी 'रक्ष' धातूचा रोखणे, अवरोध करणे, अडवणे, बळकावणे असा अर्थ घेतला. ते झाले 'राक्षस' काही म्हणाले यक्षामः ते झाले यक्ष (खाऊन टाकू)

यक्ष हे सुंदर असतात अशी कल्पना आहे. यक्षाची एक संज्ञा राजा आहे. कुबेर त्यांचा अधिपती म्हणून त्याला राजाधिराज म्हणतात. साधारणतः हिमालयात किंवा जलाशयाच्या जवळ यक्षांचा निवास असतो. कुबेर हा महायक्ष आहे.

यक्षांनी धर्मराजाला काही कूटप्रश्न विचारले व त्याने त्यांची समर्पक उत्तरे दिली अशी कथा आहे. Yaksha's Quiz. आपण आजही अवघड प्रश्नाला यक्षप्रश्न म्हणतो.

वित्तेश वित्त म्हणजे संपत्ती, तिचा स्वामी

*Notes*

| T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | MAR |

www.madhaveeraghuveer.com

२२

पावक (अग्नि) - आठ वसूंमध्ये पावक ही भगवंताची विभूति आहे. पुराणात व उपनिषदात त्यांची नावे वेगवेगळी आढळतात. ऐश्वर्यप्राप्तीसाठी वसूंची पूजा करावी असे सांगितले जाते. अग्नि हे सर्व देवतांना यज्ञाचा हवि पोहोचवणारे तसेच भगवंताचे मुख आहे. ∴ हव्यवाहन म्हटले आहे. अग्नीत हीण कधीही रहात नाही सर्व पवित्र (पावन) होते. त्यामुळे पावन करणारा तो पावक असे नाव आहे. अग्नीची भूक कधीही शमत नाही. तृप्ती होत नाही. न अलम् (पुरेसे) इति अनलम् म्हणून अनिल हे नाव अग्निला मिळाले आहे.

२३ मेरु - सुमेरु पर्वताला पृथ्वीचा केंद्रबिंदू मानले आहे. सोने, चांदी, तांबे इ. शिखरे असणारे जितके पर्वत आहेत त्यात सुमेरु मुख्य आहे.

समुद्रमंथनाच्या प्रसंगी या मेरु पर्वताची रवी बनवली होती अशी कथा आहे.

पृथ्वीचे स्वतःभोवतीचे भ्रमण या पर्वताला केंद्रबिंदू करून होते असे मानले जाते.

२४ पुरोहितांमधील बृहस्पती - पूर्वी राज्यकारभारात व धार्मिक गोष्टीत राजाला सहाय्य करणाऱ्या मुख्य ब्राह्मणाला पुरोहित असे म्हणत. वसिष्ठ महर्षी हे राजा सुदासाचे पुरोहितच होते. राजपुरोहित आपल्या राजाच्या कल्याणाची सदैव चिंता करीत आणि राजाला

Notes

मेरु पर्वत आज ताजीकिस्थानात असून त्याला पामिर असे नाव आहे.

| 2011 | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| FEB | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 |

मार्गदर्शन करीत. शास्त्रशुद्ध आचरणाने त्यांचे ब्रह्मतेज लखलखीत होत असे.

पुरोहित हा मंत्रानुष्ठानसंपन्न, वेदांचा ज्ञाता, कर्मतत्पर, जितेंद्रिय, लोभमोहरहित, षडंगविद असावा. धर्म आणि धनुर्विद्या यांचे त्याला ज्ञान असावे. म्हणजे त्याच्या भीतीने राजाही धर्मरत व नीतीने वागणारा होत असे. असे शुक्रनीतिसार सांगते.

देवांना असे पुरोहित मिळाले होते तेच बृहस्पती! या जगाचे किंवा जलाचे रक्षण करतो तो - बृहतः महतः अस्य जगतः उदकस्य वा पाता रक्षिता। किंवा बृहती म्हणजे वाणी (परावाणी) तिचा पती म्हणजे बृहस्पती. असा बृहस्पती भगवंताची विभूति असावी हे संयुक्तिकच आहे.

सेनापतींमध्ये स्कन्द - मूर्तिमंत शौर्याचे प्रतीक! स्कंद म्हणजेच कार्तिकेय. स्कंदाची पत्नी देवसेना ही इंद्राची मावसबहीण होती. इंद्राची विनंती मान्य करुन तो देवांचा सेनापती झाला. याला सहा मुखे व बारा हात होते.

जलाशयात मी समुद्र आहे. पृथ्वीच्या पृष्ठभागावर ७१% पाणी आहे. त्यातील सर्वात मोठा भाग सागर आहे. भारताच्या तर तिन्ही बाजूला समुद्र आहे. पृथ्वीच्या नैसर्गिक संतुलनात सागराचा वाटा फार मोठा आहे. आपल्या मर्यादेत राहणारा धीरगंभीर सागर याला पयोनिधी, अर्णव, सरित्पती अशी नावे आहेत.

*Notes*

| T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | MAR |

www.madhaveeraghuveer.com

त्याच्या पोटात अनंत रत्ने सामावली आहेत. म्हणून त्याला रत्नाकर म्हणतात. अनेक वनस्पती, जलचर, प्रवाळ, शंख शिंपले हे सागरातच सापडतात.

सागर हे स्थिरतेचे, समृद्धतेचे प्रतीक आहे. सागराला कधीही पूर येत नाही. किंवा तो कधीही आटत नाही. अनेक रत्नांची, मौक्तिकांची खाण आहे. त्याच्या पोटातून विलक्षण अशी चौदा रत्ने निघाली. त्याच्यापेक्षा भव्य काही नाही म्हणून सागराला भगवंताची विभूति मानले आहे.

(२१) महर्षींमध्ये भृगू - भृगू हे एक श्रेष्ठ ब्रह्मर्षी व वैदिक सूक्तद्रष्टे होते. ऋग्वेदात भृगूचा १८ वेळा उल्लेख आला आहे. त्यापैकी १६ वेळा बहुवचनी उल्लेख केला आहे. त्यावरून ऋग्वेदकाळात भृगुकुळ प्रधान असले पाहिजे. भृगुंनी अग्नीचा प्रथम शोध लावला. भृगु हा वरुणाचा पुत्र आहे. वरुणापासून याला ब्रह्मज्ञान प्राप्त झाले. याला वारुणी भृगु म्हणतात.

याचा लत्ताप्रहार भगवान विष्णूने आपल्या छातीवर 'श्रीवत्सचिन्ह' म्हणून धारण केले. यानेच नहुषाला शाप दिला व नंतर उद्धाराचा मार्ग सांगितला.

तैत्तिरीय उपनिषदाचा तिसरा भाग भृगुवल्ली म्हणून ओळखला जातो. यानेच सर्वांना धर्मोपदेश केला. सृष्टीची उत्पत्ती व विस्तार याचे समग्र मार्गदर्शन भरद्वाजाला केले.

*Notes*



www.madhaveeraghuveer.com

भृगुस्मृती, भृगुगीता, भृगुसंहिता, भृगुसिद्धांत, भृगुसूत्र इ० ग्रंथ प्रसिद्ध आहेत. त्यापैकी भृगुसंहिता हा ज्योतिषविषयक ग्रंथ अपूर्व मानला आहे.

भृगु आणि अंगिरस यांची वेदांतविषयक चर्चा अथर्ववेदात आहे. सप्तर्षींपैकी एक - भक्तिमार्गाच्या प्रवर्तनाचे फार मोठे श्रेय याला जाते.

गिरा म्हणजे वाणी. त्यात मी ॐकार आहे.

सर्वात प्रथम साडेतीन मात्रा असलेला प्रणव प्रगट झाला. मग त्यानंतर त्रिपदा गायत्री, नंतर त्यापासून वेद आणि मग वेदापासून शास्त्र, पुराण इ० संपूर्ण वाङ्मयजगत प्रगट झाले. म्हणून या सर्वांचे कारण असल्याने आणि सर्वांत श्रेष्ठ असल्याने भगवंतांनी या एकाक्षरी प्रणवाला आपली विभूति म्हटले आहे.

अकरा प्रमुख उपनिषदांपैकी माण्डूक्य उपनिषद यात केवळ १२ मंत्र आहेत. यात ओंकाराच्या साडेतीन मात्रांचे विवेचन आले आहे. प्रश्नोपनिषदात सुद्धा ओंकाराद्वारे परमतत्त्वाचे ध्यान करण्याचा निर्देश आला आहे.

थोडक्यात ॐकार हे परब्रह्माचे नाव आणि अपर ब्रह्माचे प्रतीक आहे.

गीतेत इतरत्रही याचे वर्णन आले आहे.

प्रणवः सर्ववेदेषु - ७.८
ओमित्येकाक्षरं ब्रह्म - ८.१३
तस्मादोमित्युदाहृत्य - १७.२४

Notes

SUNDAY 20

| T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | MAR |

यज्ञातील जपयज्ञ - कोणतेही त्यागस्वरूप कर्म म्हणजे यज्ञ होय. विद्वानांचा सन्मान, समाजाचे संघटन आणि सत्पात्री दान या तीन तत्वांनी युक्त असे कोणतेही त्यागमय कर्म म्हणजे यज्ञ होय.

इतर सर्व यज्ञांमध्ये अनेक वस्तू-पदार्थांची, विधींची आवश्यकता असते. ते करण्यात काहींना काही थोडा दोष असतो. मात्र जपयज्ञ हा हिंसादी दोषांपासून मुक्त असतो. त्यामुळे जपयज्ञ हा सर्व यज्ञात श्रेष्ठ आहे.

मंत्र इत्यादींची त्या अर्थभावनापूर्वक आवृत्ती निष्ठेने करणे याला जप असे म्हणतात.

जप म्हणजे केवळ नामस्मरण नाही. जप हे अनुष्ठान आहे. जपयज्ञाचे तीन प्रकार आहेत.

१. वाचिक - मंत्राचा मोठ्याने उच्चार करणे.

२. उपांशु - मंत्रदेवतेच्या चरणी मन बुद्धी एकाग्र करून अस्फुट स्वरात मंत्र जपणे.

३. मानस - मंत्राच्या अर्थाशी अनुसंधान ठेवून मनातल्या मनात जप करणे.

मानस जप हा सर्वश्रेष्ठ जपयज्ञ आहे.

स्नान झाल्यावर यथाशक्ती पवित्र मंत्र जपावे. विशेषत: गायत्री मंत्र व पुरुषसूक्त यांचा अवश्य जप करावा. ॐ नमो विष्णवे, ॐ नमो वासुदेवाय किंवा ॐ नमो भगवते वासुदेवाय असे मंत्र १०८ किंवा १००८ वेळा जपावे.

www.madhaveeraghuveer.com

*Notes*

| 2011 | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| FEB | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 |

अजपाजपाविधि - श्वसन करणाऱ्या प्राणिमात्रांच्या ठिकाणी हा अजपाजप जन्माच्या क्षणापासून मरणाच्या क्षणापर्यंत अखंडपणे पण नकळत चाललेला असतो. ह्या विधीला अनुसरून त्याचा संकल्पपूर्वक उच्चार केला आणि असा क्रम नियमाने प्रत्यही ठेवला म्हणजे हा जप जाणिवेच्या कक्षेत येऊन त्यावर सहजपणाने अनुसंधान राहू लागते. त्यामुळे कोणत्याही क्षणी ह्या जपावर मन तत्काळ एकाग्र होते. आणि सहजपणे अभ्यास घडू लागतो. अनंत जन्मातील पापसंस्कार धुवून जातात. चित्त स्वच्छ शांत आणि प्रसन्न होते. शारीरिक व्याधी आणि मानसिक आधी ह्यांची पीडा दूर होते. सूर्योदयापूर्वी अर्धा घटका जपाचे अनुष्ठान करावे.

स्थिर रहाणाऱ्यांमध्ये मी हिमालय पर्वत आहे. ज्याचे अधिष्ठान बृहत् विशाल आहे अशा पर्वतांमध्ये भगवंतांची विभूति हिमालय आहे. हा जगातील सर्वात मोठा पर्वत आहे. सिंधु ते ब्रह्मपुत्रा असा १५०० मैल लांब पसरलेला असून त्याचा दक्षिणोत्तर विस्तार २५० मैल आहे. एव्हरेस्ट, गौरीशंकर, कांचनगंगा अशी त्याची अनेक बर्फाच्छादित शिखरे आहेत. गंगा-यमुना यासारख्या पवित्र नद्या हिमालयात उगम पावतात. महाभारतातील अनेक घटनांना हिमालय पर्वताचा संदर्भ आहे. हिमालयावरील अरण्यात असंख्य औषधी वनस्पती विपुल प्रमाणात मिळतात. आणि

*Notes*

| T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | MAR |

www.madhavpeeraghware.com

त्याच्या कुशीत विविध प्रकारची रत्ने प्राप्त होतात. अनेक तपस्वी ऋषींचे आश्रम हिमालयात होते. वसिष्ठ ऋषींचा आश्रम हिमालयाच्या पायथ्याशी तर वाल्मीकी ऋषींचा आश्रम तमसेच्या तीरावर होता. कण्व ऋषींचा आश्रम मालिनीच्या तीरावर तर मारीच ऋषींचा आश्रम हेमकूट पर्वतावर होता. या सर्वांमध्ये व्यास महर्षींचा आश्रम विशेष प्रसिद्ध होता. हा आश्रम बदरीनारायण या क्षेत्राच्या थोडा पुढे आहे. इथेच भारताची व भागवताची रचना झाली. व्यासगुंफा. माना बॉर्डर.

हिमालयात तपस्वी जनांची परंपरा प्राचीन काळापासून चालत आली आहे. आजही दीर्घायु मोठमोठे योगी आणि संतजन हिमालयात साधना करत असतात. स्वामी रामतीर्थ व स्वामी विवेकानंद यांनाही तपश्चर्येसाठी हिमालयाचा परिसर योग्य वाटला.

धर्म, संस्कृती, देवता, साहित्य, कला इ० जीवनाच्या सर्व अंगावर हिमालयाचा प्रभाव आहे. तो केवळ दगडमातीचा डोंगर नसून हिंदूंना ते पूज्य देवालयच वाटते. कैलास व मानस सरोवर ही हिमालयातील सर्वश्रेष्ठ तीर्थक्षेत्रे आहेत. त्यांची यात्रा अवघड आहे. त्याचप्रमाणे अमरनाथची यात्रा ही अवघड आहे. पंजाबातील ज्वालाजी हे देवीचे स्थानही प्रसिद्ध आहे. पशुपतीनाथ हे नेपाळमध्ये आहे. गंडकी नदीमध्ये

*Notes*

| 2011 | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| FEB | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 |

www.madhaveeraghuveer.com

शाळिग्राम सापडतात.

उत्तुंग हिमालयाच्या दर्शनाने विषयवासना आपोआप मावळतात. वैराग्याला दुप्पट जोर चढतो. प्रपंचाची आसक्ती कमी होत जाते.

मला नाही उरली आता ओढ प्रपंचाची।
साद देती हिमशिखरे शुभ्र पर्वताची।।

आजही हिमालयात अनेक ऋषी-मुनी जगाच्या कल्याणासाठी तपश्चर्या करीत आहेत.

हिमालयाने हवामानाच्या दृष्टीने भारताचे संरक्षण केले आहे. उत्तरेकडून येणारे विलक्षण थंड वारे अडवले जातात. हिमालयामुळेच आपल्या देशात विपुल जलवृष्टी होते. हिमालयातील नद्यांमुळेच उत्तर भारताची भूमी सुजलाम सुफलाम झाली आहे. अशा रीतीने केवळ हिमालयामुळेच भारतीयांचे जीवन सुखकारक झाले आहे.

आयुर्वेदाच्या दृष्टीनेही हिमालयाचे महत्त्व असाधारण आहे. हिमालयात विविध औषधी वनस्पती विपुल प्रमाणात मिळतात. प्राचीन ऋषींनी त्यांचा अनुभव घेऊन हिमालयाच्या परिसरातच चर्चा केली आणि ग्रंथ रचले. तात्पर्य हिमालय म्हणजे भगवंताची विभूति! केवळ भारतवर्षाचाच नव्हे तर तो अवघ्या पृथ्वीचा मानदंड आहे.

हिमालयाची तुलना वेदांशी केली आहे कारण वेदांप्रमाणेच सत्य व मोक्षप्रद ज्ञान येथेच मिळते.

www.madhaveeraghuveer.com

*Notes*

| T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | MAR |

२४

8.00 (२६) सर्ववृक्षाणां अश्वत्थः - पिंपळ - सर्व वृक्षांचा राजा।
अश्वत्थं पूजितो येन सर्वं संपूजितं भवेत)
9.00 पिंपळ हा एक सौम्य वृक्ष आहे. याच्या खाली
कोणतेही झाड वाढू शकते. आणि हा डोंगर, घराचे
10.00 छत, भिंती इ० कठोर जागेवरही उगवतो. पिंपळाच्या
वृक्षाच्या पूजेचे मोठे माहात्म्य आहे. आयुर्वेदात
11.00 पुष्कळशा रोगांना नष्ट करण्याची शक्ती या
पिंपळवृक्षात आहे. या सर्व वृक्षांनी भगवंतांनी
12.00 पिंपळाला आपली विभूति मानली आहे.
अश्वत्थाचे सृष्टीरूपक पंधराव्या अध्यायात
1.00 आले आहे. अश्वत्थः प्राहुः अव्ययम्। म्हणजे
अश्वत्थ वृक्षाला अविनाशी चिरंतन टिकणारा
2.00 मानतात. मात्र खरे तर हा विनाशशील व क्षणभंगुर
आहे. त्याची उपपत्ती अशी आहे - अ + श्व + स्थ
3.00 श्व म्हणजे उद्या, स्थ म्हणजे टिकणारा आणि
अ चा अर्थ नकारात्मक घ्यायचा. म्हणजे उद्या न
4.00 टिकणारा, नाश पावणारा असा हा वृक्ष आहे.
दुसरा अर्थ असा आहे की सूर्याचे अश्व ह्या पिंपळाखाली
5.00 विसावले आहेत म्हणून अश्वत्थ असे नाव पिंपळाला
पडले. अश्वत्थ हा वेदकाळापासून पूज्य ठरला आहे.
6.00 याच्या लाकडाच्या नौका बनवत असत. यज्ञात अग्निमंथन
करण्यासाठी उत्तरारणी अश्वत्थाची करत. सोमरसासाठी
7.00 अनेक पात्रे अश्वत्थाच्या लाकडापासून करत. या
वृक्षाला वैबाध, वारुण, पिप्पल अशी नावे आहेत.

*Notes*

मूलतो ब्रह्मरूपाय मध्यतो विष्णुरूपिणे।
अग्रतः शिवरूपाय अश्वत्थाय नमो नमः॥

| 2011 | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| FEB | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 |

www.madhaveeraghuveer.com

8.00 द्वा सुपर्णा या श्रुतीत ज्या पिप्पल फळांचा उल्लेख
आहे ते याच विश्ववृक्षाचे फळ आहे. अनुगीतेत
9.00 यालाच ब्रह्मवृक्ष किंवा ब्रह्मवन म्हटले आहे.
सतत परिवर्तनशीलता हा याचा धर्म आहे
10.00 त्यामुळे सृष्टी सदैव ताजी व टवटवीत असते.
याच्या पानांचा नेहमी सळसळ आवाज येतो.
11.00 व ती नेहमी चमकत असतात. कारण त्यामध्ये
पाऱ्याचा अल्प अंश असतो. तो बुद्धिवर्धक असतो.
12.00 त्यामुळे पिंपळाच्या पानावर गरम भात तूप घालून
खाल्ला असता स्मरणशक्ती चांगली होते असे म्हणतात.
1.00 (विवेकशास्त्री गोडबोले - सातारा)
देवर्षींमध्ये मी [illegible] आहे असे भगवंत म्हणतात.
2.00 पुराणात सात नारदांचा उल्लेख आला आहे. परंतु
भक्तीपीठाचे आचार्य व भक्तीसूत्राचे निर्माते नारद
3.00 ब्रह्मदेवाचे मानसपुत्र असावेत. हे नेहमी वीणा
घेऊन भगवन्नाम संकीर्तन करत फिरत असतात.
4.00 नारदांची भक्तीसूत्रे म्हणजे भक्तीयोगाचे नवनीतच
आहे. महाभारतासारख्या ग्रंथात नारदांच्या गुणांचे वर्णन
5.00 आले आहे. कळलाव्या नारद म्हणून ओळखले जातात
पण खरी वस्तुस्थिती तशी नाही. हे भगवंतांच्या
6.00 मनोगतानुसार वागणारे आहेत. आणि भगवंताला जशी
लीला करायची असेल तशी पूर्वपीठिका हे पूर्वीच
7.00 तयार करून ठेवतात म्हणून नारदांना भगवंताचे
मन म्हटले आहे. वाल्मीकी आणि व्यासांना उपदेश

Notes

SUNDAY 27

| T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | MAR |

करून रामायण आणि महाभारतासारखे ग्रंथ निर्माण करण्यासाठी प्रवृत्त करणारे नारक्य आहेत. मनुष्य, देवता, असुर, नाग इ० सर्व नारदांच्या वचनावर विश्वास ठेवतात आणि त्यांना मान देतात.

वीणेच्या झंकाराबरोबर भक्तिगान करून लोकांची हृदये शुद्ध करण्याचे काम नारदांनी केले.

गन्धर्वाणां चित्ररथः - स्वर्गात गायन करणाऱ्यांना गंधर्व म्हणतात आणि अशा गंधर्वांमध्ये चित्ररथ मुख्य आहे. अर्जुनाशी याचे मित्रत्व होते. याच्याकडूनच अर्जुनाने गायन विद्या शिकली होती.

गंधर्व गायन वादन कलेत निष्णात असतात. स्वर्गातील इंद्रसभेत यांच्याकडे गाण्याबजावण्याचे काम असते. याखेरीज चाक्षुषी विद्या, संमोहनशास्त्र अशा काही दिव्य विद्या त्यांना ज्ञात असतात.

अंतरिक्षातला न्यसन्चय गंधर्वांच्याच स्वाधीन असतो. त्यांची शस्त्रे वीजेसारखी तेजाळ व घोडे वाऱ्याला देखील मागे सारणारे असतात. कुमारिका लग्नाच्या इच्छेने चित्ररथ गंधर्वाची पूजा करतात.

चित्ररथ गंधर्वानेच अर्जुनाला चाक्षुषी विद्या दिली. धौम्य ऋषींना पुरोहित करण्याचा सल्ला अर्जुनाला दिला. वसिष्ठांचे अलौकिक चरित्र यानेच पांडवांना सांगितले. युधिष्ठिराला याने वेगाने धावणारे चारशे दिव्य अश्व दिले होते. गंधर्वात तो सर्वश्रेष्ठ असल्यामुळे तो भगवंताची विभूति होय.

Notes

| 2011 | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| FEB | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 |

सिद्धांमध्ये कपिल - जो निःसन्देह तो सिद्ध. निश्चल स्वरूपता हे सिद्धाचे मुख्य लक्षण होय. महामुनी कपिलाचा जन्म कर्दम आणि देवहुती यांच्या पोटी झाला. त्यांनी आपली आई देवहुती हिला उपदेश केला.

पाच महाभूते, पाच तन्मात्रा, अंतःकरण चतुष्टय, पाच ज्ञानेंद्रिये, पाच कर्मेंद्रिये या चोवीस तत्त्वांची मिळून प्रकृती होते. भगवान हे पंचवीसावे तत्त्व आहे.

याशिवाय कपिल मुनींनी अष्टांग योग आणि भक्तीचा महिमाही सांगितला आहे.

षड्दर्शनांपैकी सांख्यदर्शनाचे कर्ता कपिल मुनी आहेत. सर्व सिद्धांचे गणाधीश सांख्यांना मानले जाते. म्हणून भगवंतांनी त्यांना आपली विभूती मानले आहे.

(२७) घोड्यांमध्ये उच्चैःश्रवा. चौदा रत्नांपैकी एक. समुद्रमंथनातून बाहेर आलेला घोडा. सात तोंडे व शुभ्र रंग असलेला हा घोडा म्हणजे इंद्राचे वाहन आहे. अमृत हेच याचे खाद्य आहे. याची प्रतीकात्मक पूजा दसऱ्याला केली जाते.

गजेंद्रामधील ऐरावत - हा सुद्धा समुद्रमंथनातून बाहेर आला आहे. तो शुभ्र वर्णाचा असून त्याला चार सुळे आहेत. इंद्राकडून याला पूर्वदिशेचे स्वामित्व लाभले होते. वैदिक वाङ्मयात याला इरावानाचा पुत्र व नागांचा राजा म्हटले आहे. वडीलांच्या नावावरून त्याला ऐरावत असे म्हणतात.

*Notes*

| T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | MAR |

www.mahaveeraghuveer

पृथु व मनु यांना विनयामुळेच राज्य मिळाले.
वेन, नहुष, सुदास यांचे राज्य नष्ट झाले.



दंड शासन करतो, रक्षण करतो

नरांमध्ये नराधिपती म्हणजे राजा! राजा हा विष्णूचा अंश मानला जातो. प्रजानुरंजन करणारा, प्रजेसाठी स्वतःच्या सर्व सुखांना तिलांजली देणारा, तो राजा! प्रभु रामचंद्र हा याचा सर्वोत्तम आदर्श.

मनुस्मृतीच्या सातव्या अध्यायात राजधर्म सांगितलेला आहे.

वेदोक्त संस्कार झालेल्या राजाने संपूर्ण राज्याचे न्यायानुसार रक्षण केले पाहिजे. सृष्टीच्या रक्षणासाठी ईश्वराने राजाची निर्मिती केली आहे.

तीन वेद, सनातन दंडनीति, वेदांत, व्यवहारज्ञान यांचा राजाने विवेकपूर्ण अभ्यास करावा. जितेंद्रिय रहावे. व्यसनांचा पूर्ण त्याग करावा. राजाने संधी, विग्रह, कोश, दंड, परराष्ट्र इ० संबंधी ज्ञात्या मंत्र्याशी विचारविनिमय करावा. राजाने आपले वर्तन शास्त्रानुकूल ठेवावे. यज्ञ याग करावे. राज्य वाढवण्याचा सतत प्रयत्न करावा. मिळवलेले धन सत्पात्री दान करावे. कासवाप्रमाणे आपल्या मर्मस्थानांना गुप्त राखावे. सिंहाप्रमाणे पराक्रम करावा. विवेकाने प्रजापालन करावे. नोकर व अधिकाऱ्यांना त्यांच्या गुणवत्ताप्रमाणे धन व पारितोषिक द्यावे. प्रजेकडून योग्य कर घ्यावा व प्रजेचे रक्षण आपल्या औरस पुत्राप्रमाणे करावे. विविध कलाकार, पंडित, विद्वान यांना अंजन द्यावे. दूताकडून वार्ता ऐकून घेऊन कामे माणसे लावावीत. प्रजेच्या हितासाठी चंदनोप्रमाणे झिजणारा

*Notes*

सिंहाप्रमाणे पराक्रम करावा, ... शत्रूला मारावे व सशाप्रमाणे निसटून जावे.
चतुरंग (हत्ती, रथ, अश्व, पदाती)

अमात्य, देश, दुर्ग, कोश व दंड ही पाच राज्याची अंगे आहेत.

| 2011 | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| MAR | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

www.madhavveraghuveer.com

जो राजा होय. असा आदर्श राजा असेल तर तो भगवंताची विभूति बनतो.

यथा राजा तथा प्रजा।

राजा जर सद्वर्तनी, पराक्रमी, शुध्द आचरणाचा असेल तर प्रजाजनही तसेच वागतात. मात्र जर राजा आळशी, व्यसनी, दुर्वर्तनी असेल तर प्रजेतील लोक त्याचेच अनुकरण करतात व राज्यनाश होतो.
अंधेर नगरी चौपट राजा। अशी अवस्था होते.

(२८) सर्व शस्त्रांमध्ये वज्र श्रेष्ठ आहे. दधीचि महर्षींच्या अस्थिंपासून इंद्राचे शस्त्र वज्र सिध्द झाले. इंद्राची अनेक आयुधे आहेत. पण या सर्वात गाजणारे त्याचे मुख्य व प्रिय आयुध म्हणजे हे अमोघ वज्रच आहे. हे वज्र पोलादी असून त्याला शंभर टोके व सहस्त्र धारा आहेत. ते शुभ्र चकचकीत आहे. ते प्रसिध्द त्वष्ट्याने तयार केलेले आहे. इंद्राने याच शस्त्राने वृत्रासुराचा वध केला. इंद्राने वृत्रासुरावर जेव्हा याचा प्रयोग केला तेव्हा एवढा मोठा कडकडाट झाला की द्यावापृथिवी भयाने थरथर कापू लागली. दधीचि हे अग्नी प्रज्वलित करणारे एक द्रष्टे ऋषी होते. हे एक तपोवृध्द, ज्ञानसंपन्न आणि आदरणीय ऋषी होते. अश्विनीकुमारांनी यांच्याकडूनच विद्या प्राप्त केली. एक श्रेष्ठ तत्ववेत्ता, ब्रह्मवेत्ता म्हणून वैदिक वाङ्मयात यांची नोंद आहे. वृत्र व अन्य

www.madhaveelaghuveer.com

Notes

असुरांच्या नाशासाठी आत्मार्पण करून आपल्या अस्थिही देणारे दधीचि भारतीय लोककल्याणाचा आदर्श ठरले आहेत.

कर्णस्त्वचं शिबिर्मांसं जीवं जीमूतवाहनः।
ददौ दधीचिरस्थीनि नास्त्यदेयं महात्मनाम्॥

थोर पुरुषांकडे - देता येणार नाही - असे काहीच नसते.

वज्राला दधीचि ऋषींच्या तपश्चर्येचे तेज लाभले आहे म्हणून भगवंतांनी वज्राला आपली विभूति मानले आहे.

सर्व गायींमध्ये कामधेनु - नवीन व्यालेल्या गाईला धेनु म्हणतात. समुद्रमंथनातून निघालेल्या १४ रत्नांपैकी कामधेनु हे एक रत्न आहे. ही सर्व कामनांची पूर्ती करत असे. ही कामधेनु वसिष्ठांच्या आश्रमात होती. तिच्याच कृपेने वसिष्ठांनी विश्वामित्रांच्या सैन्याला षड्रससंपन्न भोजन दिले. कामधेनूचे वैभव पाहून विश्वामित्र दिपून गेले व वसिष्ठांकडे कामधेनूची मागणी केली. वसिष्ठांनी नकार दिल्यावर विश्वामित्रांनी युद्धाचे आव्हान दिले. तेव्हा कामधेनूने आपल्या शरीरातून शक-यवन-शबर-किरात-बर्बर इ० जमातीचे सैन्य निर्माण करून विश्वामित्रांचा पराभव केला. ललाट, नेत्र आणि कान विशाल असलेली गाय श्रेष्ठ व शुभ लक्षणांनी युक्त मानली जाते. कामधेनु अशीच होती.

प्रजोत्पत्तीसाठी आवश्यक काम ही भगवंतांची विभूति!

*Notes*

| 2011 | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| MAR | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

www.madhaveeraghuveer.com

अनंत हा अग्निवर्णी तर वासुकी हा पीतवर्णी आहे.
सर्प सविष तर नाग निर्विष असतात.
" एक डोक्याचा तर नाग अनेक डोक्यांचे।

प्रजोत्पत्तीसाठी आवश्यक असलेला काम हा वासनेहून वेगळा आहे. धर्माविरुद्धो भूतेषु कामोऽस्मि भरतर्षभ। शास्त्रानुकूल काम हे भगवंतांचेच रूप आहे. संयमाने राहून एक पत्नीव्रत पाळणे आणि केवळ ऋतुकालीच आपल्या पत्नीशी समागम करणे. त्यासाठी केवळ पुढील संतती निर्माण करण्यासाठी सात्विक भावनेने समागम करणे हे कामभावनेचे शुद्ध स्वरूप आहे. आणि हे शुद्धरूप म्हणजे भगवंतांची विभूति।

सर्पांचा राजा वासुकी – कश्यप आणि कद्रू यांचा हा पुत्र आहे. याला ९९ भाऊ आहेत. वासुकीचा वर्ण निळा आहे असे मानतात. त्याचे वाहन कासव आहे याच्या पत्नीचे नाव शतशीर्षा (पातालनिवासिनी) होय. त्रिपुरदाहप्रसंगी हा शिवधनुष्याची दोरी झाला होता तर समुद्रमंथनप्रसंगी याचीच मंथन दोरी बनवली गेली होती.

२९ जसा वासुकी हा सर्पराज तसा अनंत हा नागराज आहे. त्यालाच शेष असे म्हणतात. त्याला सहस्र मुखे आहेत असे मानले आहे. क्षीरसागरात भगवंतांची शय्या होऊन त्यांना सुख पोहोचवतो. यांनी अनेक वेळा भगवंतांबरोबर अवतार घेऊन त्यांच्या लीलेत सहभागी होऊन कार्य केले आहे. राम अवतारात लक्ष्मण तर कृष्ण अवतारात बलराम होऊन आला आहे.

३८ सगळ्या जलजंतूंचे आणि जलदेवतांचे अधिपती वरुण आहेत. वरुण हा जलाधिपती असल्याचे वेदांनी

*Notes* SUNDAY 6

वासुकी शंकराच्या अंगावर केवळची अंगठी असून
समुद्रमंथनाच्या वेळी नेत्र क्षीरसागर घुसळला

| F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | APR |

म्हटले आहे. वरुण हा विश्वव्यवस्थापक व धर्मरक्षण करणारा देव आहे. मनुष्यमात्रांच्या पापपुण्याचा, न्याय अन्यायाचा हिशेब ठेवून त्याप्रमाणे त्यांना बक्षिस वा शिक्षा देणे हे काम त्याच्याकडे देण्यात आले आहे. सूक्तांच्या मानाने त्याचा क्रमांक इंद्र, अग्निच्या मानाने बराच खाली असला तरी त्याची योग्यता महिमा व सामर्थ्य श्रेष्ठ आहे. त्याच्या नावावर १०-१२ सूक्ते आहेत. मनुष्याची कसलीही बरी वाईट कृत्ये, त्यांच्या मनातील विचार सुध्दा त्याला कळतात. दुष्ट, पापी लोकांना तो शासन करतो मात्र पश्चात्ताप झाला तर तो दया दाखवतो. तो अतिशय उदार आहे. तत्पर आहे. तो रोग उत्पन्न करतो व दूरही करतो.

वरुण हा आदितीचा पुत्र आहे. त्याने, स्वर्ग, पृथ्वी व अंतरिक्ष यांच्या हितार्थ व सुखार्थ मेघांना अधोमुख करुन त्या उदकाने ही सर्व भूमि भिजवून चिंब करुन सोडली. आपल्या आदित्य मायाशक्तीच्या योगाने त्याने सर्व विश्वाला सावरुन धरले आहे.

पितरांमध्ये अर्यमा ही विभूति प्रमुख असून पितर हा एक देवसमूह आहे. ऐतरेय ब्राह्मणानुसार मानव वंशाचे गंधर्व, पितर, देव, सर्प आणि मनुष्य हे पाच उपविभाग होते. यापैकी देव आणि पितर यांपासून कालांतराने मनुष्याची निर्मिती झाली. मृत व्यक्तींचा आत्मा अग्निच्या ज्या माध्यमाने

Notes

| 2011 | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| MAR | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

www.madhaveeraghuveer.com

पितृलोकी जाऊन पोहोचत असे तो मार्ग 'पितृयाण' किंवा अर्चिरादि नावाने ओळखला जातो.

हविर्द्रव्ये हा पितरांचा आहार असून यमासमवेत तसेच अन्य देवतांसमवेत हे आनंदाने भोजन करतात. सहस्रांच्या संख्येने हे यज्ञीयस्थानी येऊन हविर्द्रव्य भक्षण करतात. हे आपल्या उपासकांचे रक्षण करीत असून उपासकांच्या पुत्रांना संतती, संपत्ती आणि दीर्घायुष्य प्रदान करतात. देवी भागवतात 'कव्यवाह' नामक पितरसमूहाचा उल्लेख आलेला आहे.

श्राद्धाच्या वेळी प्राचीनावीती करून आणि स्वधा ~~[illegible]~~ अशी आहुती देऊन अर्पण केलेले अन्न आणि सोमरस योगमार्गाद्वारा पितर भक्षण करतात. त्यांना भात, सातू, मूग, उडीद, गाईचे दूध, तूप, मध आदि खाद्य पदार्थ तसेच श्वेत पुष्प, दर्भ इ. साहित्य प्रिय आहे. मात्र मसूर, हुलगे, अंबाडी, बकरीचे मांस हे अप्रिय आहे. तसेच कुमक, बेल, रुई, धोतरा आणि कडुनिंब निषिद्ध मानले जाते.

या पितरांत अर्यमन सर्वश्रेष्ठ आहे. ऋग्वेदात सुमारे शंभर वेळा या देवतेचा निर्देश आढळतो.

वैशाख महिन्यात प्रकाशित होणाऱ्या सूर्याला हे नाव दिले आहे. मानवी संस्कृतीचा विकास करणारी लोकोत्तर महर्षिकुळे पुढे पितर संज्ञेस प्राप्त झाली. त्यातील अर्यमा या वैदिक देवतेला भगवंताची विभूती असे म्हटले आहे.

www.madhaveeraghuveer.com

*Notes*

| F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | • | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | • | APR |

नियमनाचा, अनुशासनाचा देव म्हणजे यम धर्म अधर्माची फळे तोच मानवांना देतो. ऋग्वेदातील चार सूक्ते याला अर्पण केली आहेत. हा जगन्नियंता देव असून सोमपान करतो.

अग्नि हा यमाचा प्रतिनिधी आहे. घुबड आणि कपोत हे त्याचे दूत आहेत. चार डोळ्यांचे दोन कुत्रे त्याच्या लोकांचे रक्षक आहेत.

ऋग्वेदात यम यमी संवाद. यमाविषयी आसक्ती वाटल्याने यमी वारंवार त्याला समागमाची विनंती करते परंतु तो आपल्या बहिणीला परावृत्त करतो. यमाचा संयम, धर्मनीतिची जाणीव व देवावरील अढळ श्रद्धा ऋग्वेदातील अलौकिक सूक्तात प्रगट झाली आहे. कठोपनिषदात यम नचिकेत संवाद आहे. यमपिता विवस्वान सूर्योदयाचे तर यम सूर्यास्ताचे प्रतीक आहे.

धर्माला अविरुद्ध असलेला काम मी आहे असे भगवंत का म्हणतात हे यातून स्पष्ट होते.

पृथ्वीचा भार, लोकसंख्येचा भस्मासुर नियंत्रित करण्याचे काम यम च करतो.

(30) दैत्यांमध्ये मी प्रल्हाद आहे. राक्षसकुळात जन्माला येऊनही आपल्या विशुद्ध भक्तीने अवघ्या भक्तकुळाला ललामभूत झालेल्या प्रल्हादाचे चरित्र अद्भुत आहे. प्रल्हाद याचा अर्थ आनंद देणारा (ल्हाद - १ आ.प.) असा आहे.

Notes दितीपासून उत्पन्न झालेल्यांना दैत्य म्हणतात.

| 2011 | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| MAR | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

९ जुलै २०१२

8.00 कथा - पूर्वी वैकुंठाच्या द्वारावर जय-विजय नावाचे
द्वारपाल होते. सनकादि चार ऋषी भगवंताच्या
9.00 दर्शनासाठी आले असता त्यांची पात्रता न समजल्याने
जय-विजयांनी त्यांना अडवले. त्यावेळी सनकादिंनी
10.00 त्यांना शाप दिला आणि जय विजय या पृथ्वीवर
हिरण्यकाशिपु आणि हिरण्याक्ष या राक्षसरूपाने अवतरले.
11.00 ते जडवादी आणि विषयलोलुप होते. वैश्विक
यज्ञाची संकल्पना मोडली. लोक ऋताधिष्ठित आचरण
12.00 करेनात. ईश्वराला कोणी मानेना. तेव्हा भगवंतांनी
वराह अवतार घेतला. वरान् आहन्ति इति वराहः।
1.00 चंगळवादी संस्कृतीच्या श्रेष्ठाला मारणारा तो वराह.
भगवंतांनी हिरण्याक्षाचा वध करून भोगवादी
2.00 संस्कृतीचा बीमोड केला.
त्यामुळे हिरण्यकशिपु संतापला. त्याने उग्र
3.00 तपश्चर्या करून ब्रह्मदेवाला प्रसन्न करून घेतले व
भयंकर वर मागितला - कोणत्याही प्राण्याकडून/
4.00 मनुष्याकडून, दिवसा/रात्री, आत/बाहेर, अस्त्र/शस्त्राने
पृथ्वीवर/आकाशात मृत्यु न यावा.
5.00 असा वर मिळाल्यावर हिरण्यकशिपु अजिंक्य
होऊन माजला. त्याने सर्व शास्त्रमर्यादा ओलांडल्या.
6.00 अशा मदोन्मत्त हिरण्यकशिपुच्या घरी चार बलाढ्य
पुत्र जन्माला आले. त्यापैकी सर्वात धाकटा प्रल्हाद.
7.00 लहानपणापासूनच त्याला कृष्णभक्तीचे वेड होते. तो
आपल्या मधुर वाणीने भगवंतांचे गुणगान करीत असे.

Notes

(सोळा)

हा प्रल्हाद दैत्यकुलाला कलंक आहे असे वाटले त्याने प्रल्हादाला ठार करण्याची आज्ञा दिली. महाभयंकर दैत्यांनी आपल्या हातातील शूलांनी घाव घातले, हत्तीच्या पायाखाली दिले. सर्पांनी डसवले, पहाडावरून खाली फेकले, मायेचा प्रयोग केला. विष प्यायला दिले. अंधारकोठडीत टाकले. अन्न तोडले, बर्फाच्या ढिगाऱ्यात कोंडले. आगीत टाकले, समुद्रात फेकले परंतु प्रल्हादावर ईश्वरी कृपा असल्याने त्याच्यावर कोणताही परिणाम झाला नाही.

प्रल्हाद असा भगवत् परायण कसा झाला? हिरण्यकशिपु जेव्हा ब्रह्मदेवाकडून वर मिळवण्यासाठी तपश्चर्या करत होता त्यावेळी देव-दैत्यांचा झगडा चालू होता. एका युद्धात दैत्यांचा पूर्ण पराभव झाला. काही मारले गेले. काहींना कैद करून नेले. त्यात हिरण्यकशिपुची पत्नी कयाधू पकडली गेली त्यावेळी प्रल्हाद तिच्या पोटात वाढत होता. नारदांना तिची दया आली व त्यांनी इंद्रदेवाला विनंती केली व कयाधू हिरण्यकशिपुची तपश्चर्या संपेपर्यंत नारदांच्या आश्रमात राहिली. तिच्या पोटातील गर्भावर कृपा करण्यासाठी नारदांनी कयाधूला उत्तम उपदेश केला. हिरण्यकशिपुच्या सहवासाने तिच्यावरचे संस्कार क्षीण झाले पण तिच्या पोटातील गर्भावर मात्र ते कायमचे कोरले गेले. हा गर्भ म्हणजेच भक्तोत्तम प्रल्हाद होय. भगवंताला वश करण्याचा सुंदर मार्ग म्हणजे भक्ती

Notes

| 2011 | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| MAR | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

www.madhaveeraghuveer.com

8.00 असे प्रल्हाद सांगत असे. सर्व चराचर सृष्टीवर
भगवंताची सत्ता चालते असे त्याचे सांगणे असे.
9.00 त्यावरूनच संतापाने उसळलेल्या हिरण्यकशिपुने
एका खांबाला लाथ मारली आणि प्रचंड कडकडाट
10.00 होऊन स्तंभ फोडून साक्षात नरसिंह प्रकट झाला.
तेव्हा प्रल्हादाने साष्टांग दंडवत घालून अश्रुपूर्ण
11.00 नयनांनी भगवंताची - नरसिंहाची - स्तुती गायली.
हिरण्यकशिपुचे पोट फाडून नरसिंहाने त्याला ठार
12.00 केले. त्यानंतर आपले उग्र रूप आवरून घेऊन
प्रल्हादाला मुक्तीचा वर दिला. प्रल्हादाने आपल्या
1.00 पित्यालाही मुक्ती लाभावी अशी इच्छा व्यक्त
केली. नृसिंहाने तोही वर दिला आणि त्यानंतर
2.00 प्रल्हादाला राज्याभिषेक झाला व दैत्यकुळातील
भक्तश्रेष्ठ म्हणून त्याचे नाव अजरामर झाले.
3.00 अशा या प्रल्हाद चरित्रात अनंत प्रेरणा आहेत.

- गर्भावर जर उत्तम संस्कार झाले तर संतती सत्प्रवृत्त होते
- 4.00 गर्भवती स्त्रियांनी यासाठी उत्तम श्रवणभक्ती करावी.
- जन्म कोणत्याही कुळात झाला तरी माणसाला
5.00 आत्मोन्नत होता येते.
- प्रल्हादाची अनन्यशरणता, शुद्ध भक्ती, निष्ठ श्रद्धा
6.00 आणि अभंग निष्ठा.
- निर्भयता. संकटांना सामोरे जाताना कचरला नाही
- 7.00 बालपणीच त्याने अध्यात्माच्या अभ्यासाला
प्रारंभ केला.

Notes

SUNDAY 13

| F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | APR |

www.madhaveeraghuveer.com

४० क्षण, घडी, दिवस, पक्ष, महिना, वर्ष इ०-गणना

काळ - कलयति आयुः म्हणजे जो आयुष्याला ग्रासतो तो किंवा कलयति सर्वाणि भूतानि म्हणजे सर्व भूतांचा संहार करतो तो. सर्व सृष्टी शेवटी कालाधीनच आहे. इथे भगवंत म्हणतात — गणना करणाऱ्यांमध्ये मी काळ आहे.

काळाला परमेश्वर असेच संबोधले आहे. उत्पत्ती, स्थिती आणि लय करणारा काळ सर्वांना सारखाच आहे. सर्व मानवांवर, प्राणीमात्रांवर, भूतमात्रांवर व दृश्य सृष्टीवर काळाची सत्ता असते म्हणून काल ही भगवंताची विभूती आहे.

कालाय तस्मै नमः असे म्हणतात ते सार्थ आहे.

४१ ४२ पशूत सिंह आणि पक्ष्यात गरुड - याही भगवंताच्या विभूती आहेत. डौल, देखणेपणा, सामर्थ्य, पराक्रम या सर्वच बाबतीत सिंह विशेष आहे.

नाभिषेको न संस्कारो सिंहस्य क्रियते मृगैः।
विक्रमार्जितसत्त्वस्य स्वयमेव मृगेन्द्रता॥

सिंह हे स्वाभिमानाचे प्रतीक आहे. कितीही भुकेला असला तरी सिंह गवत खात नाही.

Self Respect चे प्रतीक सिंह आहे.

गरुड हा कश्यप आणि विनता यांचा पुत्र आहे. विनता सत्प्रवृत्त तर तिची सवत कद्रू तामसी होती. इंद्राच्या उच्चैःश्रवस या दैवी अश्वाचा रंग कोणता याबद्दल या दोघींची पैज लागली होती.

Notes

| 2011 | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| MAR | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

कद्रूने कूटनीतीचा अवलंब करून पैज जिंकली व विनतेला हिला एक सहस्र वर्षपर्यंत दासी बनवले. परंतु विनतेचा पुत्र गरुड याने आपल्या आईला दास्यमुक्त करण्यासाठी स्वर्गातून अमृत आणले. त्यासाठी बलाढ्य देवांबरोबर झुंज दिली. पहाऱ्यावर असणाऱ्या नागांना चुकवून अमृताचा कलश नेला. तथापि स्वतः अमृत प्राशन केले नाही. त्यामुळे विष्णूने प्रसन्न होऊन त्याला वर दिला आणि गरुड हा विष्णूचे वाहन झाला. वैष्णवधर्मात गरुडाला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. द. भारतातील मंदिरात विष्णूपुढे गरुड हात जोडून उभा असतो. यज्ञसंस्थेतही गरुडाचे महत्त्व आहे. गरुड पुराणाची रचना प्रत्यक्ष गरुडाने विष्णूच्या प्रेरणेने केली.

२३

पवित्र करणाऱ्यांमध्ये वायु - वायु ही एक श्रेष्ठ वैदिक देवता आहे. ऋग्वेदात वायुसाठी सहा सूक्ते आहेत. त्याला द्यावा पृथ्वीने निर्माण केले असून त्याला त्वष्ट्याचा जामात म्हटले आहे. तो अत्यंत रूपसंपन्न व स्वैरसंचारी आहे. तो देवांचा आत्मा असून सर्व भूतमात्रांचा प्राणरूपाने हृदयस्थ आहे. वायु हा सर्व भुवनांचा राजा असून मोठा विचित्रकर्मा आहे. तो एकदा भडकून जोराने वाहू लागला म्हणजे त्याचा घनगंभीर घोष गिरिकंदरात दुमदुमून जातो. त्याचा शब्द ऐकू येतो पण त्याचे रूप कोणालाही दिसत

*Notes*

www.madhaveeradhiveer.com

नाही. असा हा वायुदेव आमचा पिता, भ्राता व सखाही आहे. त्याच्या घरी अमृताचा निधी आहे. रोगनाशक व सुखकारक असे हितकर उदक देण्याबाबत, आयुष्य वाढवण्याबद्दल, निजलेल्या भक्ताला जागृत करण्याबद्दल, उषेला प्रकाशित करण्याबद्दल त्याची प्रार्थना करण्यात आली आहे.

हनुमान, भीम, मध्वाचार्य हे सर्वजण वायुचेच अंशावतार मानले जातात.

प्राण, अपान, समान, व्यान आणि उदान हे पाच प्रधान प्राण आणि नाग, कूर्म, कृकल, देवदत्त व धनंजय हे पाच उपप्राण हे वायुरूपच आहेत.

शिवाय अपरा प्रकृतीतील पंचमहाभूतांपैकी एक वायु आहेच. रूपरहित स्पर्शवान वायुः असे तर्कसंग्रह ग्रंथात सांगितले आहे. जगताचे पोषण करण्याचे काम सूर्याच्या प्रेरणेने वायु करतो. जीवनाला कारणीभूत असणारे श्वसन आणि जीवन प्रक्रियेला पोषक ठरणाऱ्या सर्व हालचाली वायूशीच संबंधित असतात. शरीराचे व सृष्टीचे संतुलन मोठ्या प्रमाणावर वायुवरच अवलंबून आहे. म्हणून पवित्र करणाऱ्यांमध्ये भगवंत वायुरूप आहेत. वायुनेच आरोग्य चांगले राखले जाते. हे सर्व खरे असले तरी सुभाषितकार म्हणतात —

वनानि दहतो वह्नेः सखा भवति मारुतः।
स एव दीपनाशाय कृशे कस्यास्ति सौहृदम्॥

*Notes*

निर्जंतुक करण्यासाठी वारा

| 2011 | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| MAR | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

www.madhaveeraghuveer.com

१४ जुलै २०१२

शस्त्रधार्यांमध्ये राम मी आहे असे भगवंत म्हणतात
श्रीरामचंद्र म्हणजे सूर्यवंशात जन्माला आलेला
प्रतिसूर्य! श्रीरामांच्या अलौकिक चरित्रावरच प्रत्येक
भारतीयाचा पिंड पोसला गेला आहे. परिपुष्ट झाला आहे.
श्रीराम - एकपत्नी, एकवचनी, एकबाणी | रामबाण.
आदर्श जीवन, रामनामामुळे पापातून मुक्ती मिळते.

राकारोच्चारमात्रेण मुखान्निर्याति पातकम् ।
पुनः प्रवेश शंकायां मकारस्तु कपाटवत् ॥

कोणत्याही हमखास इलाजाला 'रामबाण' इलाज म्हणतात.
रामप्रहर, रामराम, रामराज्य, रामबाण, एखाद्या गोष्टीत
राम नसणे, शेवटचा राम म्हणणे अशा आपल्या रोजच्या
जीवनात राम मिसळला आहे.

माशांमध्ये भगवंत मगरमत्स्य आहे. दशावतारात
मत्स्याचा अवतार प्रथम आहे. शतपथ ब्राह्मण,
भागवत पुराण, मत्स्य पुराण इ. ठिकाणी मत्स्यावतार
कथा आली आहे. ती सर्वश्रुत आहे. मात्र ती
रुपकात्मक आहे. मनूचा मासा म्हणजे मनूचा सात्विक
विचार आणि मनूचा मासा मोठा झाला म्हणजे त्याचा
सात्विक विचार सर्वत्र प्रसृत झाला. मनूने सर्व समाज
सत्वयुक्त केला.
जलचरांमध्ये मगर सर्वात बलवान असते.

www.madhaveeraghuveer.com

Notes

| F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | APR |

सर्व नद्यांमध्ये जान्हवी ही भगवंताची विभूती आहे. भारतातील सर्वात पूज्य नदी म्हणजे भागिरथी गंगा। ऋग्वेदात गंगेचा दोनदा उल्लेख आला आहे. सगरपुत्रांच्या उद्धारासाठी तिला भगिरथाने पृथ्वीवर आणले. म्हणून ती भागीरथी. जह्नु ऋषींचा आश्रम तिने पावन केला म्हणून ती जाह्नवी. स्वर्ग पृथ्वी, पाताळ असा त्रिलोकात संचार करणारी म्हणून ती त्रिपथगा. विष्णूचे चरण धुणारी म्हणून ती विष्णुपदी होय. याशिवाय अलकनंदा, मंदाकिनी इ० तिची अनेक नावे आहेत.

सर्व आचार्य, संतांनी गंगेचे स्तवन केले आहे. चरक, चक्रपाणिदत्त यासारख्या श्रेष्ठ आयुर्वेदाचार्यांनी गंगेचे जल पथ्यकारक व रोगनिवारक असल्याचे सांगितले आहे. तिला गंगामाता म्हणतात.

जगन्नाथ पंडितांनी याच गंगेच्या घाटावर बसून गंगालहरी या ५२ श्लोकी स्तोत्राची रचना केली. गोदावरी, कृष्णा, कावेरी किंवा कोणत्याही लहान मोठ्या नद्यांना त्या त्या ठिकाणचे लोक आदराने, मोठ्या भक्तिभावाने गंगा म्हणतात.

एखाद्या संस्थेच्या सांठवलेल्या निधीला लोक प्रेमाने गंगाजळी म्हणतात. स्नान करताना रोज गंगेचे स्मरण केले जाते. त्यामुळे त्या पाण्याला गंगेचे पावित्र्य प्राप्त होते. पूर्वी स्नानाच्या पात्राला गंगाळे (घंगाळे) म्हणत असत.

*Notes*

| 2011 | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| MAR | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

www.madhaveeraghuveer.com

गंगेच्या काठी मृत्यु आला तर मोक्ष मिळतो असे भाविक मानतात. किंवा मृत्यु जवळ आला असेल तर त्या व्यक्तीला गंगाजळ देतात.

गङ्गा गङ्गेति यो ब्रूयात योजनानां शतैरपि।
मुच्यते सर्वपापेभ्यो विष्णुलोकं स गच्छति॥

गंगोत्री येथून गंगेचा उगम होतो आणि प्रयाग क्षेत्री त्रिवेणी संगम आहे.

यथा नयति कैलासं नगं गानसरस्वती।
तथा नयति कैलासं न गंगा न सरस्वती।

(३२) सर्व सृष्टीचा आदि अंत व मध्य मीच आहे.

सर्ग म्हणजे विश्वाची रचना वा सृष्टी. जीवात्मा - परमात्मा, इंद्रिये, अहंकार, महत (बुद्धी) सूक्ष्म तत्वे, त्रिगुण, विश्वनिर्मिती, पंचमहाभूते हे सर्व सर्गाचेच विषय आहेत. अवघ्या सृष्टीची सुरुवात, मध्य आणि शेवट भगवंतच आहेत.

ज्या विद्येने मनुष्याचे कल्याण होते तिला अध्यात्मविद्या म्हणतात. इतर सांसारिक कितीही विद्या हस्तगत केल्या तरी शिकणे शिल्लकच रहात असते. परंतु ही अध्यात्मविद्या प्राप्त झाल्यावर शिकणे अर्थात जाणून घेणे बाकी रहात नाही. म्हणून हिला भगवंतांनी आपली विभूती म्हटले आहे. अध्यात्मविद्या हीच ब्रह्मविद्या आहे. आत्माविषयीचे

www.madhaveeradhuveer.com

Notes

SUNDAY 20
Holi - 2nd Day (IN)

| F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | APR |

ज्ञान ते अध्यात्मज्ञान होय. अध्यात्मविद्येचा सर्वाधिक सूक्ष्म विचार उपनिषदांनी केला आहे.

कठोपनिषदात यमाने नचिकेताला केलेला ब्रह्मविद्येचा उपदेश अमोलिक आहे. छांदोग्य उपनिषदातच अध्यात्मविद्येचे सार असलेले 'तत्त्वमसि' हे महावाक्य आरुणि - श्वेतकेतु संवादात आलेले आहे. आणि बृहदारण्यक उपनिषदात याज्ञवल्क्य - मैत्रेयी संवाद आहे. आदि शंकराचार्यांनी उपनिषदातील उपदेश एकश्लोकीत सूत्रबद्ध केला आहे.

किं ज्योतिस्तव भानुमानहनि मे रात्रौ प्रदीपादिकम्।
स्यादेवं रविदीपदर्शनविधौ किं ज्योतिराख्याहि मे।
चक्षुस्तस्य निमीलनादिसमये किं धीर्धियो दर्शने।
किं तत्राहमतो भवान्परमकं ज्योतिस्तदस्मि प्रभो॥

आत्मा हा स्वयंज्योती आहे. तो आत्मा कामरहित, पापरहित आणि अभयरूप आहे. तो निष्काम आहे, शोकशून्य आहे. तो प्राणांचा प्राण, कानांचा कान, डोळ्यांचा डोळा, मनाचे मन असा आहे.

मुंडक उपनिषदात महर्षी अंगिरा आणि शौनक यांच्या संवादातून हीच अध्यात्मविद्या आहे.

तात्पर्य - ब्रह्मविद्या वा आत्मविद्या वा अध्यात्मविद्या हीच पराविद्या होय. ती जाणल्यामुळे सर्व जाणले जाते. भारतीय संस्कृतीत अध्यात्मविद्येचे स्थान अपूर्व आहे.

www.madhaveeraghuveer.com

Notes

| 2011 | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| MAR | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

वाद - दोन्ही बाजू (सत्य/असत्य) जाणून घेण्याची प्रामाणिक इच्छा. पूर्वग्रह नाही. कोरी पाटी Tabula Rasa मिमांसकांची

8.00 परस्परात विवाद करणाऱ्यांमध्ये तत्त्वनिर्णयासाठी केला जाणारा वाद मी आहे.

9.00 शास्त्रार्थाचे तीन प्रकार आहेत.
वितण्डा - दुसऱ्याचे मत खंडन करण्यासाठी
10.00 जल्प - आपल्या मताचे मंडन करण्यासाठी
वाद - आत्मतत्त्वाच्या बोधासाठी केलेला शास्त्रार्थ.
11.00 तत्त्व जाणण्याची इच्छा करणाऱ्या व्यक्तीबरोबर संवाद म्हणजे वाद होय. वादविद्या म्हणजे बौद्धिक, 12.00 तर्कशुद्ध संस्कृतीच्या विकासाचे लक्षण होय. जनकासारखे श्रेष्ठ राजे अशा परिषदा भरवत असत. 1.00 वादसभेला - तद्विद्यसंभाषा म्हणत. वादविद्येलाच आन्वीक्षिकी विद्या म्हणतात.

2.00 गीतेत कोणत्याही मताचे खंडन मंडन नाही तत्त्वबोध होणे म्हणजे परमेश्वराचे यथार्थ स्वरूप 3.00 समजणे. त्यामुळे 'वाद'ही भगवंताची विभूति आहे यात नवल नाही.

4.00 (33) अक्षरातील मी अकार आहे. वर्णमालेतील प्रथम 5.00 अक्षर अ आहे. शिवाय प्रत्येक व्यंजनाला 'अ' मुळे पूर्णत्व प्राप्त होते. अकार हीच संपूर्ण वाणी 6.00 आहे. कारण अकाराशिवाय वाणीचे संपूर्ण उच्चारण होऊच शकत नाही. भगवंत अक्षरात अकार आहेत. 7.00 परंतु मंत्र वा वचनात ॐकार आहेत. ॐकाराच्या साडेतीन मात्रांमधी अकारच आहे.

Notes

अकाराचे स्पंदन नाभीपाशी होते. अनाहत ध्वनीच्या जवळचा स्वर 'अ' आहे

| F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | APR |

५३

समासामध्ये द्वंद्व दोनापेक्षा अधिक शब्दांच्या मिळून समास बनतो. अव्ययीभाव, तत्पुरुष, बहुव्रीही आणि द्वंद्व हे चार प्रमुख समास आहेत. मात्र द्वंद्व समासात दोन्ही पदांना समान महत्व असते. उदा० रामलक्ष्मणौ, भीमार्जुनौ

सर्व सृष्टी द्वंद्वात्मक आहे. सुखदुःखे लाभालाभौ इ० निर्द्वंद्व होणे हाच खरा मोक्ष आहे. भगवंत सर्व द्वंद्वाच्या अतीत आहेत. परंतु त्यांची व्यावहारिक सत्तेतील अभिव्यक्ती द्वंद्वात्मक आहे. म्हणून द्वंद्व ही भगवंताची विभूती आहे.

इतरेतर द्वंद्व, समाहार द्वंद्व.

५४

अक्षय काल - ३० व्या श्लोकात कालः कलयतामहम्) असे सांगितले आहे. परंतु कालाचे दोन प्रकार आहेत
१. क्षय काल २. अक्षय काल.

इथे सांगितलेला अक्षयकाल म्हणजे कालाचाही महाकाल आहे. क्षयकाल नित्य बदलतो. दिवस, रात्र, आठवडा, पक्ष, मास, वर्ष इ० त्याची परिमाणे आहेत. हा क्षयकाल ज्योतिषशास्त्राचा आधार आहे. त्यानेच संसारातील कालाची गणना होते. मात्र अक्षयकाल परमात्मस्वरूप असल्याने अविकारी आहे. पुढे अकराव्या अध्यायातही भगवंतांनी आपण अक्षय काल आहोत असे म्हटले आहे.

कालोऽस्मि लोकक्षयकृत्प्रवृद्धो - - - ।

Notes

| 2011 | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| MAR | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

www.madhaveeraghuveer.com

I am the creator whose face is turned on all sides
विश्वतोमुखः ।



१५ जुलै २०१२

५५ विराट रूप (विश्वतोमुखः) भगवंत विराटस्वरूप असून सर्वांचे धारण पोषण करणारे आहेत. पुरुषसूक्तात याचे वर्णन आले आहे.

१. मुख - ब्राह्मण
२. बाहू - क्षत्रिय
३. मांड्या - वैश्य
४. पाय - शूद्र
५. मनापासून - चंद्र
६. नेत्रांपासून - सूर्य
७. मुखापासून - इंद्र, अग्नि
८. श्वासोच्छ्वासापासून - वायू
९. नाभिपासून अंतरिक्ष
१०. मस्तकापासून - द्युलोक
११. दोन्ही चरणांपासून - भूमी
१२. कानापासून दिशा

प्रत्येकामधून तोच आत्मा सर्वत्र पहात असतो

चराचर सृष्टी व्यापून पुन्हा दशांगुळे उरणारा विराट पुरुष म्हणजे परमात्मा होय.

(३४) सर्वांचा नाश करणारा **मृत्यु** - मृत्युवर कोणाची सत्ता चालत नाही. पण मृत्यु मात्र सर्वांवर सत्ता गाजवतो. अतिसामान्यांपासून चक्रवर्ती सम्राटापर्यंत सर्वांवर मृत्युची सत्ता आहे. श्रीदासबोधातील पूर्ण एक समास (३.९) समर्थांनी मृत्युनिरूपणासाठी दिला आहे. एकदा अंतकाळ आला की मग मृत्यु विचार करत

Notes

www.madhaveeraghuveer.com

नाही की हा क्रूर, झुंजार किंवा संग्रामशूर आहे.
हा रागीट प्रतापी, उग्र स्वभावाचा मोठा दुष्ट आहे.
हा बलाढ्य, धनाढ्य किंवा सर्व गुणांनी संपन्न
आहे. हा विख्यात, श्रीमंत किंवा अद्भुत पराक्रमी
आहे. हा भूपति म्हणजे राजा. चक्रवर्ती म्हणजे
महाराजा किंवा सम्राट किंवा मोठा युक्तिबाज किंवा
मंत्रतंत्र जाणणारा आहे. चौफेर ज्ञानसंपन्न पुण्यपुरुष,
हरिदास किंवा विशेष सत्कर्म करणारा आहे हे
मृत्यु ओळखत नाही. त्याला सर्व सारखेच!

सर्व दृश्य विश्वाला मृत्यु अटळ आहे. जो
जन्मास येतो तो हमखास मृत्यु पावतो. मृत्यूच्या
तडाख्यातून कोणीही सुटू शकत नाही. म्हणून
विचारी माणसाने मृत्यूची निरंगी जाणीव ठेवून
जीवनाचे सार्थक करावे. हा लोक मृत्युलोक याच
नावाने विख्यात आहे. मात्र मृत्यूने देह गेला तरी
कीर्तिरूपाने स्वतः लोकांमध्ये उरावे. मृत्यूवर जय
मिळवण्याचा हाच मार्ग आहे.

पंडितांचे समुदाय गेले, अपार वाद करणारे गेले.
संन्यासी गेले, सारासार विचार करणारे विचारवंत
गेले. ब्राह्मण, आचार्य असे पुष्कळजण गेले.
असे सारे गेले पण संत मात्र टिकले. आत्मज्ञान
होऊन जे स्वस्वरूपाशी एकरूप झाले तेवढे
मात्र टिकले. या जगात सर्वात निश्चित गोष्ट
कोणती असेल तर ती मृत्यु. तो अटळ आहे.

www.madhaveeradhuveel.com

Notes

| 2011 | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| MAR | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

आणि म्हणूनच हरण करणाऱ्यांमध्ये मृत्यू ही भगवंताची विभूती मानली आहे.

मृत्यूबद्दल कबीर म्हणतात —

आए है तो जाएंगे राजा रंक फकीर ।
इक सिंहासन चढि चले इक बांधी जात जंजीर ॥

असेच संत तुकाराम, समर्थ रामदासस्वामी अशा अनेकांनी मृत्यूचे वर्णन केले आहे.

आजच्या काळातील कवी भा. रा. तांबे म्हणतात.

रामकृष्णही आले गेले
त्याविण जग का ओसचि झाले।

किंवा मृत्यूवर काळ हेच औषध आहे. म्हणून

सगे सोयरे डोळे पुसतील
पुन्हा आपुल्या कामी लागतील
उठतील बसतील
हसुनि खिदळतील
मी जाता त्यांचे काय जाय?
जन पळभर म्हणतील हाय हाय ॥

या जगात मृत्यूचे दुःख आहे आणि जीवनाचा, जन्माचा आनंद आहे. पण खरे पाहिले तर उलट परिस्थिती असते. आयुष्य म्हणजे दुःखद घटनांची शृंखला असते. म्हणूनच कवी म्हणतात — हरिदूता का विन्मुख व्हावे? किंवा कवी सुरेश भट म्हणतात —

सरणावर जाता जाता इतुके मज कळले होते।
मरणाने केली सुटका जगण्याने छळले होते ॥

*Notes*

SUNDAY 27

| F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | APR |

www.madhaveeraghuveer.com

५६

उत्पन्न होणाऱ्या सर्वांमध्ये मी उद्गम आहे. परमात्म्याचे सामर्थ्य असे आहे की तो सर्वांचा ग्रासही करतो आणि स्वसामर्थ्याने निर्माणही करतो. यापूर्वीही भगवंतांनी अहं सर्वस्य प्रभवो मत्तः सर्वं प्रवर्तते असे सांगितले आहे.

आता भगवंत स्त्रियांमधील विभूति भगवंत सांगतात.

५८ कीर्ति ५९ श्री ६० वाणी ६१ स्मृती ६२ मेधा ६३ धृती ६४ क्षमा

हे स्त्रीचे सर्वोच्च गुण आहेत. पुरुषामध्येही हे गुण असतात. परंतु हे सात गुण स्त्रीलिंगी आहेत. आणि या सात गुणांनी शोभून दिसते ती खरी स्त्री असे म्हटले जाते. या सात गुणांचा आपण उलट क्रमाने विचार करूया. या सर्वात श्रेष्ठ गुण म्हणजे 'क्षमा'. स्त्रीला क्षमेची साक्षात मूर्ती म्हटले आहे. कितीही मोठ्या अपराधाला स्त्री क्षमा करू शकते. क्षमा ही पृथ्वीचे एक नाव आहे. पृथ्वी देखील स्त्रीलिंगीच. ती तिच्यावर केले जाणारे अनेक अत्याचार क्षमापूर्वक सहन करते. आपण पृथ्वीवर चालतो, नाचतो, उड्या मारतो, खणतो, इमारती बांधतो, झाडे लावतो, तोडतो पण तिची काहीच तक्रार नाही. मात्र आपण याची जाणीव ठेवून रोज सकाळी उठल्यावर जमिनीवर पाय ठेवण्यापूर्वी तिची क्षमा मागावी व म्हणावे —

समुद्रवसने देवि पर्वतस्तनमण्डले ।
विष्णुपत्नि नमस्तुभ्यं पादस्पर्शं क्षमस्व मे ॥

Notes

| 2011 | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| MAR | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

स्त्रीची सर्व रूपे - पत्नी, माता, बहीण, सासू, सून, वहिनी - ही क्षमाशीलच आहेत. दुसऱ्याला क्षमा केल्याने आपण काही लहान होत नाही उलट क्षमा करणाऱ्याचे महत्व वाढते. आणि पुढे घडणारा कलह आधीच आटोक्यात येतो.

क्षमा शस्त्रं करे यस्य दुर्जनः किं करिष्यति ।
अतृणे पतितो वह्निः स्वयमेवोपशाम्यति ॥

आपल्या मनातील क्रोधरूपी तृण आधीच नष्ट केले तर तो अग्नी आपोआपच शांत होतो असे हे क्षमेचे महत्व! घरामध्ये भांड्याला भांडे लागणारच किंवा रस्त्याने जाताना कोणाच्या तरी धक्का लागणारच तेव्हा अरेरावीने बोलण्यापेक्षा पटकन क्षमस्व - Sorry म्हटले म्हणजे समोरचा आपोआपच शांत होतो. गमतीने असे म्हटले जाते - आपली चूक तत्काळ कबूल करतो तो खरा माणूस! पण आपली चूक नसतानाही जो कबूल करतो त्याला 'नवरा' म्हणतात. असो. गमतीचा भाग बाजूला ठेवूया. तर अशी ही 'क्षमा'.

दुसरा गुण आहे 'धृती', हा देखिल अत्यंत महत्वाचा गुण आहे. धृती म्हणजे धारणा. म्हणजे बुद्धी जे ग्रहण करते ते धारण करून ठेवणारी ती धृती. किंवा दुसऱ्या शब्दात सांगायचे झाले तर संकल्प आणि सिद्धी यातील दुवा म्हणजे 'धृती'! आपण संकल्प खूप करतो पण त्यातील सिद्धीला फारच थोडे जातात. कारण त्यासाठी धृती कमी पडते.

Notes

| F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | APR |

www.madhaveeradhuveer.com

8.00 संकल्प हा मनात असतो आणि त्याची सिद्धी
ही कृतीतून दिसते. जर आपली धृती तितकी
9.00 सामर्थ्यवान असेल तर आपला प्रत्येक संकल्प
सिद्धीमध्ये परिवर्तित होईल, नाहीतर मग नुसते
10.00 मनोरथ रचले जातील. मनातले मांडे मनातच
करपतील. कल्पनांचे इमले कोसळून पडतील.
11.00 त्यामुळे हा दुसरा महत्त्वाचा गुण आहे धृती.

आता तिसरा गुण म्हणजे 'मेधा'. याचा
12.00 सामान्यतः बुद्धी असा अर्थ केला जातो पण बुद्धीच्या
चार पायऱ्या आहेत. बुद्धी, मेधा, प्रज्ञा, प्रतिभा.

1.00 बुद्धी म्हणजे सामान्यतः प्रत्येक जीवाला
अगदी लहान बाळाला सुद्धा असते ती दूध पिण्याची
2.00 दुखण्याखुपण्याची ती बुद्धी. ती सर्वांना जन्मजात
पण कमीजास्त असते. याच्या पुढची पायरी मेधा.
3.00 कोणत्याही विषयाचा नेमका अभ्यास करण्याची
शक्ती म्हणजे मेधा. ही प्रयत्नाने व अभ्यासाने
4.00 वाढवता येते. अभ्यासाने कोणत्याही विषयातील
सखोल ज्ञान मिळवणे अवघड नाही. अशा अभ्यासू
5.00 माणसाला मेधावी म्हणतात. ज्याला विषयाची
समज चांगली आहे. नीटपणे ज्याच्या लक्षात राहते
6.00 योग्य-अयोग्य याचा विवेक जो उत्तमपणे करू
शकतो ज्याला वेळेवर आणि योग्य प्रकारे सुचते,
7.00 ज्याचा विचार सर्वांगीण असतो तो मेधावी.
परमार्थासाठी बुद्धी तीक्ष्ण असावी लागते.

जीवन साधना - अनंतराव आठवले.

Notes

प्रपंच- परमार्थ

www.madhaveeraghuveer.com

| 2011 | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| MAR | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

आता यानंतरचा गुण आहे तो म्हणजे 'स्मृती' याचा सरळ सरळ अर्थ आहे स्मरण किंवा आठवण. विद्यार्थ्याने खूप अभ्यास केला आणि परीक्षेच्या वेळेस ते आठवले नाही तर काय उपयोग? मात्र थोडा वेळच पण योग्य वाचन केले आणि परीक्षेच्या वेळी ते सर्व व्यवस्थित आठवून लिहिता आले तर त्याचा आनंद वेगळाच असतो. त्यामुळे बुद्धीच्या कक्षेतच स्मृती येते. केवळ एकदा, दोनदा श्रवण करून लगेच मुखोद्गत करणाऱ्यांना स्मृतीचे वरदान लाभलेले असते. इथे स्मृती या शब्दाला आणखी एक छटा आहे ती म्हणजे सोऽहम् ही स्मृती असणे. मी देह नाही मी तो आहे. मी त्या परब्रह्माचा अंश आहे ही आठवण जागी असणे म्हणजे स्मृती.

याच्या पुढचा गुण म्हणजे 'वाणी' म्हणजे बोलणे पण उगीच वायफळ बोलणे नाही तर विचारपूर्वक आणि विचारप्रवर्तक बोलणे म्हणजे 'वाणी' प्रत्यक्ष देवी सरस्वतीचा कृपाप्रसाद लाभलेली वैखरी म्हणजे वाणी. अशा या वाणीचे तप १७ व्या अध्यायात सांगितले आहे. दुसऱ्याला न खुपणारे, सत्य, प्रिय, हितकारक आणि अभ्यासपूर्ण असे बोलणे असावे. अशीच वाणी आपल्या मुखात असावी. याच्या उलट दुसऱ्या प्रकारचे जे बोलणे आहे त्याला बाष्कळ किंवा वायफळ बडबड असे म्हणतात.

Notes

| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | 2011 |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | APR |

www.madhavaraghuveer.com

जगद्गुरु आदि शंकराचार्य आपल्या साधना पंचकम् या स्तोत्रात म्हणतात.

न तु वृथा वाक्यं समुच्चार्यताम् ।

म्हणजे अर्थ असे (एकही वाक्य बोलू नये. आणि खरंच याला शास्त्राधार आहे. जर वेडवाकडे, अनावश्यक, वायफळ न बोलता मोजकेच अभ्यासपूर्ण बोलले तर ती देवी सरस्वतीची पूजाच घडते. त्यातून वाणीला एक प्रकारचे वजन प्राप्त होते आणि वाचासिद्धी लाभते.

यानंतरचा महत्त्वाचा गुण म्हणजे 'श्री'- संपन्नता, समृद्धी. मात्र इथे नुसती पैशाअडक्याची दागदागिन्यांची संपन्नता अपेक्षित नाही तर सर्वार्थाने श्रीमंती अपेक्षित आहे. धनधान्य, जमीनजुमला, दूधदुभते या सर्वांनी युक्त असलेली संपत्ती म्हणजे 'श्री' त्याचबरोबर विचारांची मनाची, दानाची श्रीमंती अभिप्रेत आहे. न्यायाचे, नीतिमत्तेचे अधिष्ठान असेल तर त्या संपत्तीला, ऐश्वर्याला, विजयाला खरी शोभा प्राप्त होते. स्थिरता लाभते आणि निरामय प्रसन्नतेचा लाभ होतो. थोडक्यात नीतिमत्तेचे अधिष्ठान असेल तरच संपत्ती ही श्री ठरते. अशा 'श्री' मध्येच संतोष, समाधान, उल्हास आणि आनंद यांचा वास रहातो. साहसे श्रीः प्रतिवसति।

आता आपण सहा दैवी गुणांच्या, विभूतिमत्त्वाचा विचार केला. हे सहा गुण जिथे एकत्र आले आहेत

*Notes*

www.madhaveeraghuveer.com

| 2011 | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| APR | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

(ख्याति)

जिथे कीर्ति येणारच तिला वेगळ्या आमंत्रणाची गरजच नाही. ती आपोआपच येते. ती सुकीर्ति आहे. श्री, वाणी, स्मृती, मेधा, धृती आणि क्षमा यांनी युक्त असलेली व्यक्ती कीर्तिमान असणार हे निःसंशय। मात्र प्रसिद्धी आणि कीर्ति यात अंतर आहे. एखाद्या व्यक्तीच्या हयातीत तिचा उदोउदो करणे वेगळे आणि मृत्युनंतरही कोणताही स्वार्थ न बाळगता त्या व्यक्तीची तत्त्वे, विचार, जीवनमूल्ये स्मरणात रहाणे, मार्गदर्शक ठरणे हे निराळे म्हणूनच प्रसिद्ध होणे सोपे आहे. पैशापाठोपाठ प्रसिद्धी मिळवता येते पण ती चिरंतन नसते.

घटं भिन्द्यात् पटं छिन्द्यात् कुर्यात् रासभरोहणम्।
येन केन प्रकारेण प्रसिद्धः पुरुषो भवेत् ॥

त्यामुळे प्रसिद्धीपेक्षा केव्हाही कीर्ति श्रेष्ठ आहे. याचसाठी समर्थांनी सांगून ठेवले आहे.

मरावे परि कीर्तिरूपे उरावे।

अशी ही उत्तमोत्तम गुणांनी युक्त असणारी व्यक्ती कीर्ति मिळवते. परमेश्वराला प्रिय ठरते.

गुणाः कुर्वन्ति दूतत्वं दूरेऽपि वसतां सताम्।
केतकीगन्धमाघ्रातुं स्वयमायान्ति षट्पदाः।

अशी व्यक्ती आपल्या वर्तणुकीतून, आचरणातून किंवा नुसत्या अस्तित्वातून इतरांसमोर एक आदर्श घालून देते.

www.madhavaraghuveer.com

(३५) गायन करावयाच्या श्रुतींमध्ये मी बृहत्साम आहे. वेदात आपण सामवेद असल्याचे भगवंतांनी अगोदरच सांगितले आहे. चार वेदातील हा तिसरा वेद आहे.

सा म्हणजे ऋचा आणि अम म्हणजे सप्त स्वर. ऋचेचे सप्तस्वरयुक्त गान म्हणजे साम होय. देवांना संतुष्ट करण्यासाठी ऋचांचे गायन कसे करावे याचे मार्गदर्शन सामवेदात आहे.

सामवेदाचे गायन करणाऱ्या एक सहस्र शाखा भारतात होत्या. आज त्यापैकी तीन शाखा प्रचलित आहेत. संगीतशास्त्रातील सा रे ग म प ध नि अशा स्वरसंज्ञा सामगायनात नाहीत त्याऐवजी प्रथम, द्वितीय अशा क्रमाने स्वर ओळखले जातात.

सामवेदाच्या गायनाच्या वेळी विविध वाद्यांचा वापर केला जात असे.

तात्पर्य वेद म्हणजे ज्ञान तर साम गान आहे. उद्गीथ म्हणजे ओंकारोपासना असून ते सामवेदाचे अंतरंग आहे. वाणीचा रस ऋचा, ऋचेचा रस साम आणि सामाचा रस उद्गीथ होय असे उपनिषदांचे सांगणे आहे. वेद म्हणजे ज्ञानाचा प्रचंड वृक्ष असून त्या वृक्षावरील सर्वात सुंदर पुष्प म्हणजे सामवेद!

सामगायन म्हणजे परब्रह्म परमात्म्याची अनुभूती. सामात 'त्वामिद्धि हवामहे' या ऋचेतील गीतिविशेष म्हणजेच बृहत्साम होय. या गानाद्वारे

Notes

www.madhavraghuveer.com

| 2011 | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| APR | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

सर्वेश्वररूपी इंद्राची स्तुती करतात. हे गान मोक्ष-प्रतिपादक असल्याने सर्वश्रेष्ठ आहे.

६.६.

गायत्री - छंद म्हणजे सहा वेदांगातील पाचवे शास्त्र वेदातील रचना पद्यमय आहे. ही वृत्तमय रचना म्हणजे छंद होय. कोणत्याही मंत्राच्या ऋषी देवता आणि छंद निश्चित आहे. त्यानुसारच मंत्र म्हणावा. छंदांचे वैदिक आणि लौकिक असे दोन प्रकार आहेत. गायत्री (२४ अक्षरे) उष्णिक (२८ अक्षरे) अनुष्टुप (32) बृहती (३६) पंक्ती (४०) त्रिष्टुप (४४) जगती (४८) हे प्रमुख सात छंद आहेत.

म य र स त ज भ आणि न हे गण आणि गुरु व लघु यामुळे छंदांची सिद्धी होते.

ज्या रचनेत विशिष्ट अक्षरांचे परिमाण असते तो छंद होय. वेदांतील मंत्रांच्या अचूक उच्चारणासाठी छंदांचे ज्ञान आवश्यक असते. गो + त्रा = गायत्र वाणीचे संरक्षण करणारा छंद. ईशकृपेने कृतकृत्य झालेली पृथ्वी गान करू लागली म्हणून पृथ्वीला गायत्री म्हणतात. किंवा गय म्हणजे प्राण आणि त्रै म्हणजे वाचवणे, रक्षण करणे. जी प्राणांचे रक्षण करते ती गायत्री. आचार्य शिष्याला गायत्री मंत्राचा पाठ देतात. तेव्हा ते त्याचे अज्ञानापासून रक्षण करतात. व्रतबंध संस्कारात वडील मुलाच्या कानात गायत्री मंत्र सांगतात.

Notes

| S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | MAY |

www.madhaveeraghuveer.com

माझ्या बौद्धिक क्षमतेला शुभमार्गावर ... प्रेरणा द्यावी चित्सूर्य - परमात्मा

वरणीयं ८×३ = २४ अक्षरे

गायत्री मंत्राचे कर्ता महर्षी विश्वामित्र आहेत. सविता देवतेला उद्देशून म्हटलेला मंत्र असा आहे.
(ॐ) तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि।
धियो यो नः प्रचोदयात्॥ (ऋ.३.६२.१०)

मनुने त्रिपदा गायत्री हे वेदांचे मुख मानले आहे. जो द्विज इंद्रियातीत होऊन तीन वर्षे निरंतर याचा अभ्यास करतो तो आकाशाप्रमाणे वायुस्वरूप होऊन ब्रह्माला प्राप्त करून घेतो. पापाच्या परिहारासाठी, देह आणि मन शुद्ध होण्यासाठी गायत्री मंत्राची थोरवी सांगितली आहे.

त्रिपाद गायत्री -

आरक्त सकाळ - गायत्री - ऋग्वेदरूप - बाला - वाहन - हंस
कर्पूरगौर दुपार - सावित्री - यजुर्वेदरूप - तरुणी - वाहन - वृषभ
श्यामा - संध्याकाळ - ~~सरस्वती~~ - सामवेदरूप - वृद्धा - वाहन गरुड
सरस्वती

ब्रह्म म्हणजे गायत्री आणि गायत्री म्हणजे ब्रह्म. समर्थ रामदास स्वामींनी गायत्री पुरश्चरण केले होते. गायत्री हा सर्वश्रेष्ठ जपमंत्र आहे.

८८

महिन्यांमधील - मार्गशीर्ष - पूर्वीच्या कालगणनेनुसार पहिला महिना मार्गशीर्ष होता. या महिन्याच्या पौर्णिमेच्या आसपास मृगशीर्ष नक्षत्र असते. या महिन्यातील शुद्ध एकादशीला मोक्षदा एकादशी म्हणतात. याच दिवशी गीताजयंती असते.

*Notes*

चैत्र - चित्रा, वैशाख - विशाखा, ज्येष्ठ - ज्येष्ठा, आषाढ - पूर्वाषाढा, श्रावण - श्रवण, भाद्रपद, आश्विन - अश्विनी, कार्तिक - कृत्तिका, मार्गशीर्ष - मृगशीर्ष, पौष, माघ - मघा, फाल्गुन -

| 2011 | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| APR | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

या महिन्याची अधिष्ठात्री देवता केशव आहे. केशव हे संध्येतील पहिले नाव आहे. या महिन्याला संवत्सराचे भूषण म्हटले आहे. नववर्षाचे पीक याच महिन्यात निघते. या महिन्यातील व्रतांची थोरवी महान आहे.

६८

सर्व ऋतूंमधील कुसुमाकर ही भगवंताची विभूति आहे. ग्रीष्म, वर्षा, शरद, शिशिर, हेमंत आणि वसंत हे वर्षातील सहा ऋतू आहेत. वसंत ऋतू म्हणजे संवत्सराचे प्रवेशद्वारच आहे. वसंत ऋतूला मधुमास असेही म्हणतात. देवतेला पंचामृत स्नान घालताना मधुस्नानाच्या वेळी ऋग्वेदातले जे मंत्र म्हटले जातात त्यात वसंत ऋतूचे वर्णन आहे.

कालिदासाने तर 'रघुवंश' मध्ये वसंत ऋतूचे खूप सुंदर वर्णन केले आहे. वसंताच्या आगमनाने वनश्रीच्या रंगरूपात होणारे बदल त्याने सूक्ष्मतेने टिपले आहेत. वसंत म्हणजे अवघ्या सृष्टीचे संजीवन!

६९

(३६) मी फसविणाऱ्यांमध्ये द्यूत आहे. भगवंतांच्या विभूतिंमध्ये द्यूत कसे? असा अनेकांना प्रश्न पडतो. पूर्वी द्यूत हे राजकारणाचे एक अंग होते. ते सर्वमान्य होते. शत्रूला पराभूत करण्याची यान, संधी, विग्रह इ. अंगे आहेत. त्यात द्यूत हे उपांग आहे. कुटिल राजनीतीचा तो एक भाग आहे. द्यूत प्रामाणिक किंवा

Notes

| S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | MAY |

अप्रामाणिक असू शकते. शिवाय या सृष्टीत सत्व, रज, तम सर्व प्रकृतिधर्मांची माणसे असतात. या अध्यायातील विभूतिमध्ये चराचरातील सत्ता उलगडली आहे. त्यामुळे चित्त हरण करण्याचे द्यूता-सारखे दुसरे साधन नाही. द्यूतातील दुसऱ्याला हरवण्याची किंवा जिंकण्याची शक्ती ही द्यूताची न मानता भगवंताची मानावी.

तेजस्वी पुरुषांमध्ये प्रगट होणारे तेज मी आहे. प्रभावशाली पुरुषांचे तेज राष्ट्रभक्ती, आत्मगौरव व स्वाभिमान यातून प्रगट होत असते. शिवाजी महाराजांनी औरंगजेबाच्या दरबारात प्रगट केले ते तेजच होते. राणा प्रतापने मोगलांविरुद्ध लढताना वनवास स्वीकारला पण त्यात विलक्षण तेज होते. भूताधिष्ठित वर्तनात तेज प्रगट होत असते. स्वा. सावरकर, लो॰ टिळक यांनी इंग्रजासमोर असेच तेज दाखवले. सीतेने रावणाच्या बंदिवासात असताना आपल्या तेजाने रावणाला दिपवून टाकले. या तेजासमोर पापी मनुष्यदेखील पाप करण्याचे धाडस करत नाही. या तेजाला भगवंत आपली विभूति म्हणतात. सोळाव्या अध्यायात दैवी संपत्तीचे सद्गुण वर्णन केले आहेत. त्यात तेजाचा प्रामुख्याने उल्लेख आहे. शिवाय सातव्या अध्यायात विभूतींचे वर्णन केले आहे त्यात हेच पद आहे ७.१०

*Notes*

| 2011 | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| APR | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

www.madhaveeraghunet.com

७१

जिंकणाऱ्यांचा विजय मी आहे. हा विजय धर्माधिष्ठित आहे. विजय हा सर्व प्राण्यांना प्रिय असतो. मात्र ज्या विजयात लोककल्याणाची आणि रामराज्यासाठी शुभ भावना असते असा विजय म्हणजे भगवंताची विभूति आहे.

७२

व्यवसाय (निश्चय) मी आहे. निश्चय केवळ बुद्धीने झाला तरी तो टिकतोच असे नाही. तो टिकण्यासाठी बुद्धीला धृतीची जोड लागते. धृतियुक्त बुद्धी म्हणजे निश्चय! निश्चयासाठी धैर्य, उद्यमशीलता अपरिहार्य आहे म्हणून निश्चयाला विभूतिचा स्पर्श आहे.

७३

सात्त्विक मनुष्यातील सत्त्वगुण ही भगवंतांची विभूति आहे. अवघे आचार्य, संत, लोकोत्तर महात्मे हे सात्त्विकतेचे पुतळे आहेत. व्यष्टित अभिमान असतो. समष्टीत समर्पण असते. सात्त्विक व्यक्तीमध्ये थोडा अहंकार असतो. मात्र अहंकार गेला की सत्त्वगुण वाढीस लागतो.

७४

(३७) वृष्णीवंशी पुरुषांमध्ये वासुदेव अर्थात मी स्वतः तुझा सखा आहे. श्रीरामांचा वंश सूर्यवंश तर श्रीकृष्णाचा जन्म चंद्रवंशात आहे. चंद्रवंशात पुरुरवा, ययाति, दुष्यंत, भरत असे थोर सम्राट झाले. याच वंशात सात्वत जन्मला. त्याच्या सात पुत्रांपैकी वृष्णी व अंधक

*Notes*

SUNDAY 10

| S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | MAY |

यांचे वंश विस्तारले. वृष्णी-अनमित्र-वृष्णि-चित्ररथ-सात्वत-कपोतरोमा-अनु-अन्धक-दुंदुभि-अरिद्योत-पुनर्वसु-आहुक अशी राजांची परंपरा झाली. आणि आहुकाला देवक आणि उग्रसेन असे दोन पुत्र झाले. देवकाची कन्या देवकी आणि उग्रसेनाचा पुत्र कंस ही चुलत भावंडे होती. वरील यादीत जो चित्ररथ राजा झाला त्याचा वंश विदूरथ-शूर-भजमान-शिनि-स्वयंभोज-हृदीक-देवमीढ-शूर-वसुदेव अशी वृष्णींची दुसरी परंपरा होय. या वसुदेवाच्या पोटी भगवंतांनी सगुणावतार घेतला. आपल्या कुळाची कीर्ति तर कळसाला पोहोचवली परंतु अंधक वंशाला सांभाळले.

पांडवांमधील धनञ्जय ही भगवंतांची विभूति आहे. नर-नारायणांपैकी नर म्हणजे अर्जुन। तो इंद्राचा अंश आणि योगेश्वर श्रीकृष्णाचा सखा होता.

आत्मा हि कृष्णः पार्थस्य
कृष्णस्यात्मा धनञ्जयः।

असे महाभारत सानंद म्हणते. भगवान श्रीकृष्ण व अर्जुन यांचे विलक्षण सख्य होते. अर्जुनाला नरोत्तम म्हटले आहे. धनुर्धारी, पराक्रमी, ऋजु मनाचा, पापभीरु वृत्तीचा, विचक्षण, जिज्ञासु, श्रद्धायुक्त अंतःकरणाचा असा अर्जुन होता.

Notes

| 2011 | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| APR | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

मुनींचे मुनी जे व्यास ती देखील भगवंताची विभूति आहे. जो वाचासंयम करतो किंवा मौन पाळतो तो मुनी किंवा मनन करणारा मुनी होय. महर्षी व्यास हे भारतीय संस्कृतीचे वैभव आहे.

व्यासोच्छिष्टं जगत्सर्वम्।

वेदांच्या संहितांची रचना, ब्रह्मसूत्रांची निर्मिती, पुराण, भागवत, महाभारत नामक जयसंग्रहाची उभारणी असे यांचे कर्तृत्व पाहिले की थक्क व्हायला होते. व्यास हे व्यक्तिनाम नसून ती उपाधी असल्याची श्रद्धा आपल्या संस्कृतीत आहे.

व्यास २८ असल्याची कथा देवीभागवतात आहे.

वर्ण सावळा व यमुनाद्वीपात जन्म म्हणून कृष्णद्वैपायन
पराशर महामुनींचा पुत्र म्हणून पाराशर्य
बदरिकाश्रमात तपश्चर्या केली " बादरायण व्यास
वेदांचा विस्तार (व्यास) केल्यामुळे वेदव्यास
सत्यवतीच्या पोटी जन्मल्यामुळे सत्यवतीसुत
याशिवाय कृष्ण, सत्यवत्यात्मज, पराशरात्मज अशी अनेक नावे आहेत.

यांनी सूत व शुक यांना महाभारत-भागवताचा उपदेश केला. यांनी पैल - वैशंपायन - जैमिनी - सुमंतु या चार शिष्यांद्वारे व्यासचर्येचा प्रसार केला. यांना अनुक्रमे ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद यांच्या संहिता दिल्या.

www.madhaveeraghuveer.com

Notes

| S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | MAY |

8.00 व्यासांच्या स्कंदीवर वर्तुळाचा परीघ ठरतो.
मानवाच्या व्यक्तिमत्वाचा व्यास जितका मोठा
9.00 तितके त्याच्या पराक्रमाचे सत्कार्याचे वर्तुळ मोठे।
म. व्यास आपल्याला कळकळून सांगतात -
10.00 ऊर्ध्वबाहुर्विरौम्येष न कश्चिच्छृणोति मे।
धर्मादर्थश्च कामश्च स किमर्थं न सेव्यते॥
11.00 मानवाने धर्माचरणी व्हावे याचाच अर्थ त्याने
सदाचरणी व्हावे असा आहे.
12.00 श्लोकार्धेन प्रवक्ष्यामि यदुक्तं ग्रंथकोटिभिः।
परोपकारः पुण्याय पापाय परपीडनम्॥
1.00 हे धर्माचे सार आहे.
महर्षी व्यासांचे आपल्या संस्कृतीवर असीमित
2.00 ऋण आहे.
नमोऽस्तु ते व्यास विशालबुद्धे
3.00 फुल्लारविन्दायतपत्रनेत्र।
येन त्वया भारततैलपूर्णः
प्रज्वालितो ज्ञानमयः प्रदीपः॥

4.00

5.00

6.00

7.00

*Notes*

| 2011 | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| APR | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

www.madhaveeraghuveer.com

७७

कवींमध्ये मी उशना म्हणजे शुक्राचार्य आहे असे भगवंत म्हणतात. कवी हा विलक्षण बुद्धिमान द्रष्टा असतो. शुक्राचार्यांचे द्रष्टेपण शुक्रनीति या राजनीति वरील ग्रंथात पहायला मिळते.

शुक्राचार्य हे दानवांचे गुरु व ज्येष्ठ आचार्य महर्षी भृगु आणि हिरण्यकश्यपुची कन्या दिव्या यांचा पुत्र. या शुक्राचार्यांची मुलगी देवयानी.

महाभारत- शिवाच्या उपासनेने यांनी संजीवनी विद्या प्राप्त केली होती. हे मृत दैत्यांना संजीवन देऊन जिवंत करीत. यांची बृहस्पतींबरोबर सदैव स्पर्धा होत असे. दैत्यांच्या चुकीमुळे यांना संजीवनी विद्या बृहस्पतिपुत्र कचाला द्यावी लागली. मदिरापान निषिद्ध असल्याचे यांनी घोषित केले.

पौराणिक संदर्भ- बलिने वामनासाठी त्रिपादभूमीचे संकल्प उदक सोडू नये म्हणून हे झारीच्या तोंडाशी बसले होते. तेव्हा वामनाने दर्भाने झारीचे तोंड मोकळे केले तेव्हा शुक्राचार्यांचा एक डोळा फुटला.

भगवंतांनी यांना आपली विभूति मानले आहे. यावरून त्यांची महत्ता सिद्ध होते.

७८

(३८) दमन करणाऱ्यांचा दंड. दमन करणाऱ्यांची शक्ती दंडनीतीत असते. दंडनीती हे मोठे शास्त्र आहे. या शास्त्रात अमात्य, राष्ट्र, दुर्ग, बल व कोश या पंचवर्गाचे सांगोपांग विवेचन असते.

*Notes*

दंडनीतीमुळे चारही वर्णांचे लोक आपापली कर्तव्ये योग्य प्रकारे करतात व अधर्मापासून दूर रहातात. राजा जेव्हा दंडनीतीला अनुसरून वागतो तेव्हा कृतयुग निर्माण होते. दंडनीती नसेल तर हे जग उच्छृंखल होईल. प्रजा नाश पावेल. बलवान लोक दुर्बलांना खाऊन टाकतील. सामाजिक, व्यक्तिगत व राष्ट्रीय चारित्र्य घडवण्यासाठी दंडनीतीची अत्यंत आवश्यकता आहे.

६८

नीती - विजिगीषुसाठी नीती लागते. अन्यथा जेते क्रूर होतात. जिंकण्याच्या इच्छेला वाव हवा तो नीतिचाच. नी म्हणजे सन्मार्गाकडे नेणे. नीतिशास्त्र म्हणजे कर्माकर्मविवेक. नीती आचरण्यासाठी इंद्रियसंयमाची नितांत आवश्यकता असते. मनुष्य इंद्रियांच्या नादी लागला म्हणजे त्याच्या हातून निःसंशय पापाचरण घडते. पण तीच ताब्यात ठेवल्याने त्याला सिद्धी किंवा मोक्ष मिळतो.

वैदिक कालखंडापासून नीतीची थोर परंपरा आहे.

भगवद्गीतेचे जणू सार सांगणारा शेवटचा श्लोक संजयच्या तोंडी आहे. जिथे योगेश्वर श्रीकृष्ण आणि धनुर्धारी पार्थ आहे तिथे श्री, विजय, विभूति आणि अचल नीती आहे. ही स्थिर रहाणारी, न डगमगणारी, कोणत्याही परिस्थितीत अविचल रहाणारी नीती आहे. नीतीचे एक अंग म्हणजे न्याय आहे.

*Notes*

| 2011 | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| APR | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

www.madhuveer.com

८०

मौन। गुप्त ठेवण्याच्या भावातील मौन ही भगवंतांची विभूति आहे. रहस्यभेदाने होणारे कार्य रेंगाळते. उलट मौन राखल्याने अनेक कार्ये सफाईदारपणे होतात.

एखाद्याच्या मनातील गोष्ट जोपर्यंत दुसऱ्याच्या कानावर जात नाही तोपर्यंत ती गुह्य (गुपित) राहते. मात्र ती गोष्ट तिसऱ्या व्यक्तीच्या कानावर गेली म्हणजेच सहा कानांनी ती ऐकली तर ती पसरायला वेळ लागत नाही ती झटकणी होते. म्हणून गुप्त ठेवायच्या गोष्टीला मौनाखेरीज पर्याय नाही. शिवाय जितके मौन साधेल तितके मनन वाढते. आत्मसंवाद वृद्धिंगत होतो. आद्य शंकराचार्य म्हणतात. न तु वृथा वाक्यं समुच्चार्यताम्।

व्यर्थ बोलू नये. वाणीचे तप साधण्याचा अधिक प्रयत्न करावा. त्यातून वाचेला वजन प्राप्त होते. परावाणीपाशी स्पंदन होणाऱ्या वाणीला वाचासिद्धी प्राप्त होते. यातूनच पूर्वी शाप आणि वर देत असत.

कोणतेही काम अधिक न बोलता केले तर ते नेटकेपणाने होते. नुसते वाचावीर फुकट असतात. त्यांच्याकडून कार्य काहीच घडत नाही.

क्रियेविना वाचाळता व्यर्थ आहे.

*Notes*

SUNDAY 17

ईशारतीचे बोलो नये। बोलायाचे सांगो नये।
सांगायाचे लिहो नये। कारणाविण।

| S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | MAY |

www.madhaveeraghuveer.com

(6)

ज्ञानाचे ज्ञान म्हणजे आत्मज्ञान होय. त्यालाच आपण ब्रह्मज्ञान किंवा अध्यात्म म्हणतो. सातव्या अध्यायात ज्ञान व विज्ञान याविषयी विवेचन आलेले आहे. धर्म, नीती, कला आणि आत्मानुभव ही ज्ञानक्षेत्रे विज्ञानाच्या कक्षेबाहेरची आहेत. इथे विज्ञानाची अभ्यासपद्धती तोकडी पडते. सर्व शास्त्रांतील सिद्धांतांचा समन्वय करणारे विशेष शास्त्र म्हणून तत्त्वज्ञानाला शास्त्रांचे शास्त्र म्हटले जाते. इदम् म्हणजे हे (दृश्य विश्व) आणि त्याच्या अपेक्षेने तत् म्हणजे ते (विश्वाचे मूलाधार तत्त्व)
त्या तत् चा तत् पणा म्हणजे तत्त्व किंवा त्या तत् चा गाभा किंवा सार त्याला तत्त्व म्हणायचे आणि त्या तत्त्वाचे ज्ञान ते तत्त्वज्ञान!

(३१) सर्वांचे आदिकारण- अवघे चराचर (स्थावर - जंगम) ईश्वरच आहे. त्यांचे बीज परमात्माच आहे. चर म्हणजे चैतन्ययुक्त आणि अचर म्हणजे ज्यात चैतन्य आहे परंतु अव्यक्त स्वरूपात आहे.

सर्व भूतांच्या उत्पत्तीचे बीज (कारण) आहे तेसुद्धा मीच आहे कारण असे चर किंवा अचर एखादेही भूत नाही की जे माझ्याखेरीज असू शकेल म्हणून सर्व काही माझेच स्वरूप आहे.

बीजं मां सर्वभूतानां विद्धि पार्थ सनातनम्। ७.१०

प्रभवः प्रलयः स्थानं निधानं बीजमव्ययम्। ९.१८

Notes चर - चार योनी - १. जरायुज २. अण्डज ३. उद्भिज ४. स्वेदज.

| 2011 | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| APR | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

www.maulaveeraghuveer.com

दिव्य शब्द सामाईक आहे. दिव्य - अलौकिक, विलक्षण
~~१०.३८ ला लोकाम आरंभ व १०.४० ने उपसंहार.~~

(४०) हे परंतपा! माझ्या दिव्य विभूतींना अंत नाही. परंतु हा विभूतींचा विस्तार मी तुला एकदेशी किंवा संक्षेपाने सांगितला आहे.

इथे अर्जुनाला परंतप म्हटले आहे.

बाह्यशत्रूला ताप देऊन त्यांना पराभूत करणारा काम-क्रोध या अंतर्गत शत्रूवर संयमाने विजय मिळवणारा

अर्जुनाजवळ हे दुहेरी सामर्थ्य असल्यामुळे त्याचे चित्त शुद्ध झाले आहे. तो तत्वज्ञानाचा, आत्मज्ञानाचा, ब्रह्मविद्येचा अधिकारी असल्यामुळे अर्जुनाला भगवंतांनी आपल्या विभूती सांगितल्या.

(४१) (४२) जे जे दिव्य, लोकोत्तर, अद्भुत शक्तीयुक्त आणि भूताला धारण करणारे आहे ते सर्व विभूतीयुक्तच आहे. सद्गुणांचा परोत्कर्ष विभूतीत असतो. भगवंताचे अंशात्मक तेज म्हणजे विभूती!

ब्रह्मांडातील सर्व विभूती कळल्या तरी ते ब्रह्माच्या केवळ एका अंशाचे ज्ञान होय. तेव्हा हे अपूर्ण ज्ञान मिळवून तुला काय साधायचे आहे? तर मीच सर्वत्र परिपूर्ण भरलेला आहे असे जाणून स्वस्थ हो.

या समग्र अध्यायाचा उद्देश हा आहे की ज्याचा जेवढा अधिकार असेल त्याने तसा हेतू समजून ज्ञान, उपासना व भक्ती यापैकी जो मार्ग अनुकूल असेल त्याचा स्वीकार करावा. आणि भगवद्रूप समजून घ्यावे व त्याचा अनुभव घ्यावा.

अथवा - तू विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर मी दिले आहे. या शिवाय मी तुझ्यासाठी विशेष सार तत्व सांगतो.

www.madhaveeraghuveer.com

विभूति म्हणजे विशेष अधिक, व्यक्त झालेली वस्तु अथवा व्यक्ति।

इंद्रिये स्वभावतः बहिर्मुख असतात. त्या बहिर्मुख इंद्रियांना ईश्वरदृष्टीचा बोध व्हावा या उद्देशानेच हा विभूतियोग सांगितला आहे.

भगवंतांचे हे वैभव पाहिले, वाचले, अंशतः अनुभवले म्हणजे मन थक्क होते. गीतेप्रमाणेच भागवतातही श्रीकृष्णाच्या अंशविभूति आल्या आहेत.

जेथे जेथे तेज, संपत्ती, कीर्ति, ऐश्वर्य, निंद्यकर्माची लाज, त्याग, आल्हाद, भाग्य, बळ, सहनशीलता व विशेष ज्ञान असते ते सर्व माझेच अंश आहेत.

जसे प्रकृतीचा क्षुद्र अंश म्हणजे आपली बुद्धी असते. बुद्धीत कितीही भाषा, कला, लिपी यांचे ज्ञान झाले तरी आपली बुद्धी ज्ञानाने भरून गेली आहे आता दुसरी भाषा, लिपी, कला यांचे ज्ञान करून घेण्यासाठी जागाच राहिली नाही असे म्हणता येत नाही. कितीही ज्ञान झाले तरी बुद्धीत जागा रिकामी असतेच. मग प्रकृतीचा लहानसा भाग बुद्धीही आपण ज्ञानाने भरू शकत नाही तर मग प्रकृतीच्या पलीकडे असलेल्या अनंत, असीम आणि अगाध असलेल्या भगवंताचा एखादा अंश अनंत सृष्टींनी कसा भरू शकतो? तो तर बुद्धीच्याही सापेक्षाने विशेष ज्ञानाने रिकामा रहात असतो.

www.madhaveeraghuveer.com

*Notes*

| 2011 | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| APR | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

प्रत्येक अणु हे घनीभूत ऊर्जाच आहे या ऊर्जेलाच चैतन्य म्हणतात. विज्ञानाप्रमाणे ते घनीभूत चैतन्यच व्यक्त होते.

या सृष्टीत नाना रूपांनी, पवित्र नद्यांच्या रूपाने, विशाल पर्वत, गंभीर सागर, वत्सल गाई, उमदा घोडा, दिलदार सिंह, स्वच्छ एकांतप्रिय सर्प यांच्या रूपाने परमात्मा सर्वत्र भरून राहिला आहे. डोळ्यांना ते पाहण्याची सवय लावायची. दुर्जनाच्या ठिकाणचा परमेश्वरही पटला पाहिजे. राम पटतो तसा रावणही पटला पाहिजे. परमेश्वरविरहित असे एकही स्थळ नाही. सर्वांची सारखीच काळजी वाहणारा कृपाळू, वत्सल, ज्ञानमूर्ति, समर्थ, पावन, सुंदर असा परमात्मा आपल्या सभोवती, सर्वत्र, सदासर्वदा उभा आहे.

www.madhaveeraghuveer.com

*Notes*

| S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | MAY |